


२ ऑगस्ट १९६९
किंमत : ४० पैसे

# निर्भीड चरित्रकार माणूस



'झोला'चे 'जर्मिनल' वाचायला घेतले. युरोपच्या मार्गावर असताना हे पुस्तक माझ्या हाती पडले हे छान झाले. पाश्चात्य संस्कृतीच्या सर्व वैगुण्यांचे एवढे रेखीव वर्णन वाचल्यानंतर आंतरमन विचार करू लागते – पाश्चिमात्य सुधारक पूर्वेकडे जाताना आपल्याबरोबर हेच घेऊन जातात ना? भांडवलाचे वर्चस्व हे त्याचे सार आहे. भांडवलाच्या या वर्चस्वातूनच सर्व दुर्गुण अनिवार्यपणे उत्पन्न झाले आहेत......

....अशी कितीएक खोल निरीक्षणे असणारी एका रशियन पंडिताची ऐतिहासिक दैनंदिनी

# माणूस

आगामी १५ ऑगस्ट विशेषांकात सादर होत आहे.

१८७६–१८८६ या कालावधीत या पंडिताने दोन वेळा भारतयात्रा केली. दक्षिणेतील शेतकऱ्यांची बंडे, वासुदेव बळवंतांचा उठाव, मुंबईतील काँग्रेसची स्थापना– अशा काही या कालखंडातील क्रांतिकारक घटना. यासंबंधी काही नवीनच माहिती या दैनंदिनीमुळे प्रकाशात येत आहे.

याखेरीज चालू घडामोडींचा परामर्श घेणारे तीन महत्त्वपूर्ण लेख...

[पृष्ठ ६४ पाहा]

२ ऑगस्ट १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक : नववा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

किमत : ४० पैसे   वार्षिक वर्गणी : वीस रुपये   परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

स.न.

'माणूस'च्या १२ जुलैच्या अंकात श्री. हेमेंद्रनाथ बॅनर्जी यांनी चालविलेल्या एका नविन विभागाचे शास्त्रीय संशोधन व त्याचे कार्य प्रकाशात आणल्याबद्दल धन्यवाद. सध्या काहींच्या मते ही विज्ञानाची बदनाम शाखा असली तरी काळच या प्रश्नाचे उत्तर देईल.


श्री. बॅनर्जींचा उपक्रम स्तुत्य असून ते या नवीन शास्त्राचे संशोधन प्रयोगासह सिद्ध करून जगापुढे ठेवतील व भारताची मान उंचावतील यात मुळीच संशय नाही.

जुलै, १९   **डॉ. महादेव वलांडीकर**, उस्मानाबाद

१९ जुलैचा 'माणूस' वाचला. त्यातील व. कृ. जोशी यांची 'जुगारी' ही कथा विशेष आवडली. श्री. जोशी यांचे लिखाण ॲड. माधव कानिटकरांसारखे आहे. त्याच अंकातील 'उदास' ही कविता आवडली. अशाच अधूनमधून कविता देत जाणे. अंक नेहमीपेक्षा दर्जेदार निघाला आहे.

जुलै, २०   **दिनकर खोगरे**, बीड

**प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.** अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक २३ जुलै

## पक्षीय चोरावर राजकीय मोर

मागच्या आठवड्यातील छक्कांतिकेचा अजून अंत झालेला नाही, ती मागील अंकावरून पुढे चालू आहे. मोरारजींचा राजीनामा स्वीकारल्यावर तासाभरातच इंदिराजींनी देशातल्या चौदा प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्याचा फलक काढून सिंडिकेटच्या पक्षीय चोरावर आपला राजकीय मोर करून दाखविला आहे. मोरारजींसारख्या मानवर माणसाला आपण ज्या पद्धतीने डच्चू दिला, तिच्यामुळे पक्षात चांगलेच वादळ माजणार आणि विशेषतः, सिंडिकेटच्या तळपायाची आग मस्तकाला पोचणार हे बाई जाणून होत्या व या समर प्रसंगाचे महत्त्व कमी करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे याहून बराच मोठा दुसरा एखादा समर प्रसंग निर्माण केला पाहिजे, हेही त्यांनी हेरले होते. बँकांचे राष्ट्रीयीकरण हा याच उद्देशाने त्यांनी टाकलेला हुकुमाचा एक्का आहे व या एक्क्याने सध्या तरी डाव जिंकला आहे असे दिसते.

या राष्ट्रीयीकरणाची प्रतिक्रिया नुसत्या राजधानीतच नव्हे, तर सगळ्या देशभर झाली आहे. विरोधी पक्षांची प्रतिक्रिया साहजिकच त्यांच्या ढंगानुसार झालेली आहे. ज्योति बसू, नंबुद्रिपाद या लालभडक लालभाईपासून करणसिंगांसारख्या ' प्रागतिका 'पर्यंत सर्वांनी या घटनेचे स्वागत केले आहे आणि ' राष्ट्रीयीकरणाच्या पहिल्या पायरीनंतर समाजीकरणाची दुसरी पायरी चढावी, ' असे मागणे मागितले आहे; उलट स्वतंत्र आणि जनसंघाने कडक निषेध केला आहे. स्वतंत्र पक्षाने राष्ट्रीयीकरणाला अनर्थकारण म्हटले आहे, तर जनसंघाने हे राष्ट्रीयीकरण म्हणजे जनतेचा कौल न घेता केलेली जनता-विरोधी कारवाई आहे असे म्हटले आहे. अपक्ष विचारवंत मंडळींत विशेष म्हणजे एकेकाळी स्वतःच्या हाताने विमा–व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करणाऱ्या चिंतामणराव देशमुखांनीही बँकांच्या राष्ट्रीयीकरणाविरुद्ध मत

दिले आहे. उद्योग-धंद्यांतल्या आणि विशेषतः बँकिंग व्यवसायातल्या मंडळींची प्रतिक्रिया प्रतिकूल झाली आहे हे सुज्ञांस सांगणे न लगे. जे. आर. डी. टाटा यांनी राष्ट्रीयीकरणाला घोडचूक म्हटले आहे, तर देना बँक'या एक प्रमुख राष्ट्रीयीकृत बँकेचे चेअरमन प्रविणचंद्र गांधी यांनी 'सामाजिक नियंत्रणाचा प्रयोग अवघा सात महिने केल्यावर त्या प्रयोगाचे मूल्यमापन करायच्या आधीच ही घाई का?' असा सवाल केला आहे.

गमत म्हणजे हे राष्ट्रीयीकरण करण्याचा 'कौल' इंदिराजींना मिळाला होता काय, याबद्दल प्रत्यक्ष काँग्रेसी मंडळींतच एकवाक्यता नाही. काँग्रेसच्या दहा कलमी आर्थिक कार्यक्रमांत राष्ट्रीयीकरण नसून सामाजिक नियंत्रण आहे, असा मोरारजींचा दावा आहे, तर या निर्णयाचे स्वरूप आर्थिक असले तरी हेतू राजकीय आहे अशी सदोबा पाटलांनी टीका केली आहे. उलट मालवियांसारख्या तथाकथित प्रगतिवाद्या-पासून चंद्रशेखरसारख्या 'तरुण तुर्कां'पर्यंत काँग्रेसमधल्या डाव्या फळीने दिल्ली-श्वरीचे कौतुक केले आहे.

## द्वंद्व की द्वंद्वगीत ?

मोरारजींच्या राजीनाम्याचे घोंगडे ज्या दिवशी भिजत पडले होते तो दिवस राजधानीत अफवांच्या पर्वणीचा काळ होता. मोरारजींनंतर यशवंतरावांचा नंबर लागणार की काय, असे अनेकांना वाटत होते. उलट मोरारजींच्या मागोमाग चव्हाण स्वतःच राजीनामा देतील अशीही अफवा होती. इतकेच नव्हे, तर मोरारजी, चव्हाण व रामसुभग सिंग या तिघांनी राजीनामा दिल्याने त्या तिघांसाठी नवीन घरे धुंडाळण्यात येत आहेत येथपर्यंत अफवांची मजल गेली होती. परंतु मोरारजींच्या राजीनाम्याचे नक्की झाल्यानंतर "आता तुम्ही मंत्रिमंडळात राहणार का?" असा एका पत्रकाराने चव्हाणांना सीधा सवाल केला तेव्हा, त्यांनी "अर्थात्!" असा मोजका जवाब देऊन तेवढी एक वावडी सफाईने कापली अन् मग ते घडले राष्ट्रीयीकरण! राष्ट्रीयीकरण होणार नाही असा निःसंदिग्ध सरकारी निर्वाळा दिल्यानंतर अवघ्या अठ्ठेचाळीस तासांत राष्ट्रीयीकरणाचा फतवा निघाला. एकदम मोरारजी-पुनर्वसनाची समस्या बाजूला सारून यशवंतराव-कामराज-निजलिंगप्पा या त्रिमूर्तींनी बाईंच्या या 'क्रांतिकारक' निर्णयाचे स्वागत केले व बाईंचे अभिनंदन केले. थोडक्यात म्हणजे मोरारजी-अवमूलनाचा बाईंचा डाव शिताफीने तडीला गेला. "मोरारजींना काढलेच का?" या मूलभूत प्रश्नावर इंदिरा गांधींशी सामना करण्यासाठी सिंडिकेटने दंड थोपटले – इतक्यात "मोरारजींना हुसकण्यासाठी तुम्ही जे पाताळयंत्री तंत्र वापरलेत ते काही शोभणारे नव्हते, बरे का ..." एवढ्या गुळ-मुळीत नाखुषीवर सिंडिकेटला माघार घ्यावी लागली; इतकेच नव्हे तर यशवंत-

रावांनी केलेल्या अभिनंदनाने बाई इतक्या प्रसन्न झाल्या आहेत की, त्या परस्पर संबंधांत आलेले वितुष्ट नाहीसे करण्यासाठी खास प्रयत्न करणार आहेत इति किंवदन्ती, म्हणजे इंदिराजी व चव्हाण यांच्यांत द्वंद्व होणार होते त्याऐवजी द्वंद्वगीत होणार म्हणायचे ! पण मोरारजींचा काटा काढण्यात इंदिराजींनी अनपेक्षित चलाखी दाखविली असली तरी त्यांचा पुढचा मार्ग निष्कंटक झाला आहे काय ? नाही ! कारण सिंडिकेट पहिल्या लढाईत हरली असली तरी युद्ध अजून संपलेले नाही. उलट राष्ट्रपति–निवडणुकीचे सूप वाजल्यानंतर नव्या दमाने व्यूहरचना करण्याचा सिंडिकेटचा मानस असावा, अशी चिन्हे दिसत आहेत.

— अनामिक

# ऐतिहासिक निर्णय....

पंतप्रधान श्रीमती इंदिराजींनी शनिवारी सायंकाळी (दि. १९ जुलै) केंद्रीय मंत्री-मंडळाच्या घाईगर्दीच्या बैठकीत देशातील प्रमुख चौदा बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा 'ऐतिहासिक' निर्णय घेऊन नवा इतिहास रचण्यास प्रारंभ केल्याची तीव्र जाणीव अनेकांना झाल्याचे दृश्य गेल्या २४ तासांत पाहण्यास मिळत आहे. हा ऐतिहासिक निर्णय घेणारी महत्त्वपूर्ण बैठक सायंकाळी सुमारे सव्वा सहा वाजता संपली. परंतु, इंदिराजींच्या इंद्रप्रस्थातील वार्ताहरांना मात्र तब्बल तीन तासपर्यंत तिष्ठत बसल्यानंतर या संबंधीची सरकारचे अधिकृत घोषणापत्र सूचना विभागातर्फे प्राप्त झाले ! भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या कार्यक्षमतेचा हा नमुना आहे आणि या मंत्रालयातर्फेच उद्यापासून (दि. २१ जुलैपासून) चौदा बँकांचा कारभार हाती घेतला जाणार आहे.

पंतप्रधानांनी हा ऐतिहासिक निर्णय, संसदेची बैठक सोमवारी प्रारंभ होण्यापूर्वी, घाईगर्दीने का घेतला आदी 'राजकारण'विषयक चर्चा दैनिकांतून रकानेच्या रकाने भरून येत असल्याने त्याची उजळणी करण्याचे हे स्थान नाही. परंतु, तब्बल तीन तास तिष्ठत बसलेल्या वार्ताहरांपैकी काहींचे बँकांविषयीचे 'अज्ञान' जर पंतप्रधानांना योग्य वेळीच ज्ञात झाले असते तर बहुधा हा ऐतिहासिक निर्णय घेणे त्यांनी टाळले असते ! हे अज्ञान स्वाभाविक असेच होते. कारण, अनेक 'भाग्यवान्' वार्ताहरांना कधी बँकेची पायरीच चढावी लागत नाही; त्यांचा 'बँक अकौंट'च नसतो तर 'बँक बॅलन्स' तरी कुठून असणार ! अशा वार्ताहरांपैकी एका वार्ताहराने अधिकृत वार्ता हाती पडण्यापूर्वी बँकांची मोजदाद चालू असताना अगदी अभावितपणे उद्‌गार काढले की, "ज्या बँकांचे राष्ट्रीयीकरण केले जाणार म्हणून मोजदाद चालू आहे त्यात 'स्टेट बँक'ची गणती (गिनती) का केली जात नाही ?" हा प्रश्न ऐकून अन्य उपस्थित वार्ताहर



# मुंबई

## दिनांक २४ जुलै

बँकांचे राष्ट्रीयीकरण श्रीमती गांधींनी केले ते उघडच स्वतःची राजकीय प्रतिमा शाबूत ठेवण्यासाठी केले ! देशातले प्रमुख अर्थशास्त्रज्ञ, श्री. देशमुखांसारखे भूतपूर्व वित्तमंत्री, श्री. के. संथानम् ह्यांच्यासारखा अर्थज्ञ व इतर अनेकांचा सल्ला धुडकावून देऊन, काही राजकीय हेतू राबवण्यासाठी हे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. विशेषतः, ' बँकिंग कमिशन 'चा अहवाल हाती येण्यापूर्वी ' सामाजिक कायद्या 'च्या अंमलबजावणीची फलिते समजण्यापूर्वीच ज्या पद्धतीने, औट घटकेच्या अध्यक्षांच्या हस्ते हा वटहुकूम काढविण्यात आला, ती पद्धतीच ह्या वटहुकूमामागचे राजकारण

---

हसताच त्या बिचाऱ्याच्या आपली चूक ध्यानी आली व त्याने आपली जीभ चावली; परंतु, तत्पूर्वीच त्याच्या अभावित प्रश्नाचे राष्ट्रीयीकरण होऊन गेलेले होते !

याच संदर्भात रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. लक्ष्मीकांत झा यांची भूमिका विशेष ध्यानी घेण्याजोगी आहे. इंदिराजींनी त्यांना मुंबईहून तातडीने बोलावून घेऊन त्यांच्याशी या महत्त्वपूर्ण विषयावर गेले दोन दिवस सतत परामर्श केला आणि मला मिळालेल्या विश्वसनीय माहितीनुसार या हाडाच्या ' आय्. सी एस्. ' मनोवृत्तीच्या अधिकारी व्यक्तीने अगदी शनिवार सायंकाळपर्यंत एकच ठाम सल्ला दिला की, बँक राष्ट्रीयीकरण सध्या नको ! परंतु, श्री. झा यांना जेव्हा केंद्रीय मंत्रिमंडळाचा (कॅबिनेटचा) निर्णय कळला त्यानंतर मात्र त्यांनी याविरुद्ध एक ' ब्र ' पण न उच्चारता केंद्रीय वित्तमंत्रालयाच्या उच्च अधिकाऱ्यांना याविषयीचा अध्यादेश (ऑर्डिनन्स) आदी कागदपत्र तयार करण्यात मदत व मार्गदर्शनच केले. ' कर्मठ नोकरशाह ' व ' चंचल राजकीय पुढारी ' यांच्या स्वभावातील व मानसिक शिस्तीतील (मेंटल डिसिप्लीन) ही तफावत विशेष मननीय असल्यानेच या घटनेचा आवर्जून उल्लेख करीत आहे. ◻ ◻

**— माणूस प्रतिनिधी**

बोलून दाखवील. परंतु आता ह्या राजकारणाची चर्चा करण्यात हशील नाही; कारण राष्ट्रीयीकरण झालेले आहे आणि ते परत मागे घेणे जवळजवळ अशक्य आहे. आता भीती वाटते ती ही की, ह्या बँकांमधील असंख्य ठेवीदारांच्या ठेवी आता सुरक्षित राहतील का? त्यांचा योग्य विनियोग होईल का? एरवी ही भीती मनात उद्भवली नसती! परंतु सरकारी मालकीखालील व्यवसायाची स्थिती पाहिली की ही शंका मनात आल्यावाचून राहत नाही. सरकारी मालकीखालील सर्वच्या सर्व औद्योगिक प्रकल्प आज तोटयात चालत आहेत, तिथे अफलातून बेबंदशाही




आहे, ही वस्तुस्थिती आहे. ह्या सर्वच ठिकाणी पैशाची उधळपट्टी चालू असल्याच्या, आर्थिक गैरव्यवहार असल्याच्या बातम्या रोजच ऐकू येतात. अशा परिस्थितीत, देशाच्या सर्वच आर्थिक नाडया शासनाच्या ताब्यात गेल्यास काय होईल हे सांगणे कठीण आहे. शिवाय कर्जवाटपाच्या वेळी 'राजकीय विचार' होतीलच हे सांगणेही नलगे. राजकीय प्रतिष्ठितांची मिरासदारीही इथे चालू होणार हेही ओघानेच आले. हे सर्व होऊनही बँकांचे व्यवहार कार्यक्षमपणे चालले व त्यांनी राष्ट्रीय-अर्थव्यवस्था सुधारली तर राष्ट्रीयीकरणाने बाजी मारली असे म्हणता येईल. 'तसं घडो' असेच म्हणत असतानाही तसेच घडेल का, ही शंका मात्र मनात घर करून राहते. फ्रान्स आणि इटलीसारख्या देशांतही राष्ट्रीयीकरणाने त्या त्या देशाचे अर्थकारण सुधारू शकले नाही. व्यवस्थापन व कार्यक्षमता ह्या दृष्टीनी भारत वरील दोन्ही देशांच्या मागे आहे हे नाकारण्यात अर्थ नाही म्हणूनच वरील शंका मनाला जास्त भेडसावते.

— सु. ल. सोमण



प्रखर देशभक्ती

सूत्रबद्ध संघटना

अमोघ वक्तृत्व

देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच

परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड

हे सर्व हिटलरपाशी होते.

तरी अखेर

त्याचा पराभव का झाला ?

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये.


# काळा दिवस

व्ही. शांताराम विषण्ण चित्ताने माईकपुढे उभे होते. गेली ३० वर्षे उरी जपलेली त्यांची व्यथा बोलकी झाली होती. सांगत होते : " 'प्रभात'च्या ४० व्या वर्धापन दिनाचा समारंभ म्हणून या प्रसंगाचे येथे वर्णन केले गेले. पण जी कंपनी अस्तित्वातच नाही तिचा वाढदिवस कसला ? 'प्रभात फिल्म कंपनी'च्या दृष्टीने हा काळा दिन मानला पाहिजे."

रसिक प्रेक्षकांना कलात्मक चित्रपट दाखविण्यासाठी मुंबईच्या उपनगरात स्थापन झालेल्या 'प्रभात चित्र मंडळा'ने योजलेला हा समारंभ होता. 'प्रभात फिल्म कंपनी'ला ४० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आपल्या पहिल्या वाढदिवसाच्या निमित्ताने मंडळाने 'प्रभात चित्रपट महोत्सवा'चा कार्यक्रम आखला होता. त्याच्या उद्घाटनप्रसंगी 'माणूस' या चित्रपटाच्या कलावंतांचा सत्कार करण्यात आला. 'माणूस' हा 'प्रभात'चा सर्वोत्तम चित्रपट. श्री. व्ही. शांताराम हेच या चित्रपटाचे दिग्दर्शक. श्री. शांताराम 'प्रभात फिल्म कंपनी'चेही एक शिल्पकार होते. व्ही. शांताराम, धायबर, एस. फत्तेलाल आणि व्ही. दामले यांनी १९२९ साली 'प्रभात'ची स्थापना केली. 'गोपालकृष्ण' या मूक चित्रपटापासून सुरुवात करून 'गजगौरी'पर्यंत (१९५८) या कंपनीने एकाहून एक सरस चित्रपट काढले. 'प्रभात' ही कलात्मक चित्रपटांची संस्थाच मानली जाऊ लागली. पुढे 'प्रभात'चा अस्त झाला तो अंतर्गत राजकारणापायी ! या महान संस्थेचा नायनाट केल्याबद्दल एकमेकांवर बरेच दोषारोप होत. जरा जुन्या पिढीत आजही 'प्रभात'च्या राजकारणाची मोठ्या चवीने चर्चा होते.

यामुळेच श्री. शांताराम जाहीररीत्या करीत असलेल्या प्रकटनाला एकदम अर्थ प्राप्त झाला. उद्घाटन समारंभाच्या उत्सुकतेला गंभीर वळण मिळाले. सबंध 'चित्रा' सिनेमाभर टाचणी पडली तरी ऐकू येईल अशी शांतता झाली. श्री. शांताराम यांचे निवेदन अवघे चार मिनिटांचे होते. ते पुढील आशयाचे काही म्हणाले : मी 'प्रभात' सोडून मुंबईला आलो व नंतर 'प्रभात'मध्ये बरेच तंटे माजल्याचे कानांवर आले. तेव्हा स्वतः पुण्याला गेलो. त्यांचे आपआपसातील बेबनाव दूर केले. पाहिजे असेल तर आर्थिक व इतरही प्रकारचे साहाय्य देऊ केले. पण मुंबईला परत आल्यानंतर कंपनी मोडल्याचेच कळले."

एका उत्तम कलाकृतीच्या कलावंतांना दाद मिळायला ३० वर्षे लागावी याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले. त्यांना अर्थातच स्टेजवर बसलेले समारंभाचे अध्यक्ष श्री. अनंत काणेकर ('माणूस'चे लेखक-गीतकार), शाहू मोडक (नायक) व श्रीमती शांता हुबळीकर (नायिका) यांचा उल्लेख करावयाचा होता. कलावंताला लगेच प्रोत्साहन मिळाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.



अनंत काणेकर, शांता हुबळीकर, व्हीं. शांताराम,
शाहू मोडक, नगरपाल डहाणूकर आणि वसंत साठे

हसणारी खळी गालांवर आणणारे शाहू मोडक व 'माणूस'च्या नायिकेचे रूप अजूनही टिकवून धरणाऱ्या श्रीमती शांता हुबळीकर यांना आधी प्रत्यक्ष व नंतर लगेच ३० वर्षांपूर्वी काढलेल्या चित्रपटात पाहताना गंमत वाटली.

'प्रभात चित्र मंडळा'ने उद्घाटनाचा चित्रपट 'माणूस' दाखविला व त्यानंतर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, कुंकू व हम एक हैं असे चार चित्रपट दाखविले. सुमारे ३० वर्षांपूर्वी काढलेले हे चित्रपट अजूनही कसे ताजे टवटवीत वाटतात ! 'कुंकू' व 'माणूस'मधील सामाजिक समस्या, संत तुकारामातील भक्तिरस आणि ज्ञानेश्वरमधील बाल ज्ञानेशाच्या अफाट बुद्धिमत्तेचे दर्शन आजही मने प्रभावीत करतात. या महोत्सवात दाखविलेल्यांपैकी हम एक हैं हा एक बेताचा चित्रपट. पण तांत्रिकदृष्ट्या तो आजच्या चित्रपटांच्या अगदी जवळ उभा राहतो. त्यातील दारिद्र्याची किंवा आगीची दृश्ये आजच्या कोणत्याही चित्रपटातील दृश्यांपेक्षा वास्तव वाटतील. स्वातंत्र्य मिळायच्या बेतास – १९४६ साली – काढलेला हा चित्रपट. त्यात त्या वेळी प्रभावी असलेल्या हिंदू–मुस्लिम–ख्रिश्चन ऐक्याचा संदेश आहे. आज हा चित्रपट पाहताना गंमत अशी वाटते की, आशयाच्या व अभिव्यक्तीच्या दृष्टीने आपले सर्वसाधारण हिंदी चित्रपट गेल्या २६ वर्षांत फारसे पुढे गेलेले नाहीत.

शेवटी 'प्रभात चित्र मंडळा'च्या स्मरणिकेतील एक नोंद. 'प्रभात फिल्म कंपनी'ने एकूण ५८ चित्रपट काढले. त्यांमध्ये ६ मूक, ३० हिंदी, १९ मराठी व ३ तामीळ या चित्रपटांचा समावेश आहे.

– दिनकर गांगल.

# मुस्लिम वृत्तपत्रे

अन्सारी

प्रगत समाजामध्ये वृत्तपत्राचे स्थान अद्वितीय आहे. वृत्तपत्रे केवळ बातम्याच देत नाहीत तर समाजाची सुधारणा करून त्याला काळाबरोबर चालण्याची शिकवण देत असतात. समाजाच्या भावना व विचार यांचे प्रतिबिंब वर्तमानपत्रांमध्ये पडलेले दिसून येते. स्वातंत्र्यलढ्यासाठी जनतेला जागृत करण्याचे काम आपल्या देशातील निरनिराळ्या वर्तमानपत्रांनी मोठ्या निष्ठेने केले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर राजकीय, सामाजिक, धार्मिक, ललित आदी प्रकारच्या नियतकालिकांची फार मोठ्या प्रमाणावर मागणी निर्माण झाली. उर्दू वर्तमानपत्रांनीसुद्धा मुद्रण, मजकूर, संपादन, प्रसार इ. सर्व बाबतींत वेगाने प्रगती करून घेतल्याचे पाहावयास मिळते.

भारतीय मुस्लिम समाजातील विचारांचे प्रतिबिंब मुख्यत: उर्दू वृत्तपत्रांमध्ये पडलेले दिसते. काही थोडी इंग्रजी, हिंदी व मराठी पत्रेसुद्धा या समाजाचे प्रतिनिधित्व करतात; परंतु संख्येने जास्त पत्रे आहेत उर्दू भाषिक! त्यामुळे मुस्लिम समाजाचे विचारप्रवाह जाणून घेण्यासाठी उर्दू पत्रांचा अभ्यास करणे पुरेसे ठरेल.

उर्दू पत्रांनी स्वतंत्र्यपूर्वकाळात जनजागृतीचे आणि विशेषत: मुस्लिम समाजाच्या जागृतीचे कार्य हिरीरीने पार पाडले. त्या काळातील वृत्तपत्रांची विभागणी राष्ट्रवादी पत्रे व जातीय पत्रे अशा दोन गटांत करता येईल.

## स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यानंतर उर्दू पत्रांनी इतर भाषिक पत्रांप्रमाणेच आपली सर्वांगीण प्रगती करून घेतली. प्रत्येक पत्राला स्वत:चे वैशिष्ट्य असले तरी एका विशिष्ट उद्देशाच्या अथवा विचाराच्या पत्रांचा एक गट, अशा प्रकारची गटवारी या वृत्तपत्रांचीसुद्धा करता येईल. साधारणपणे ती अशा प्रकारची असेल :

१. छोटी वृत्तपत्रे : सर्वसाधारणत: ही पत्रे एखाद्या व्यक्तीच्या मालकीची असतात. या व्यक्तीचे धोरण म्हणजे या पत्राचे धोरण असते. या पत्रांना ध्येय असे नसते. पैसेवाल्यांची ही पत्रे मुख्यत: सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी

अथवा स्थानिक राजकारणात आपला प्रभाव प्राप्त करण्यासाठी असतात. स्थानिक अथवा प्रादेशिक गरजा या पत्रांकडून भागविल्या जातात.

२. राजकीय मुखपत्रे : आपापल्या पक्षाची विचारसरणी जनतेत पसरविण्यासाठी काही राजकीय पक्षांनी उर्दू वृत्तपत्रे काढली आहेत. ही पत्रे प्रत्येक समस्येकडे आपल्या पक्षाच्या दृष्टीकोणांतूनच पाहत असतात, त्यामुळे त्यांना स्वतंत्र विचारसरणी अशी नसते. भारतामध्ये इतर पक्षांच्या तुलनेने कम्युनिस्ट पक्षाची उर्दू पत्रे अधिक आहेत. 'ह्यात', 'किसान–मझदूर' व 'उर्दू ब्लिट्झ्' ही अशा प्रकारची वृत्तपत्रे होत.

३. धार्मिक वृत्तपत्रे : फाळणीनंतर मुस्लिम समाज एका प्रखर वैचारिक संघर्षातून जात आहे. आधुनिकतेने दिलेल्या आव्हानामुळे या समाजाच्या मुळावरच हल्ला झाला आहे. वारंवार होणाऱ्या जातीय दंग्यांमुळे या समाजाच्या एका मोठ्या गटाचे मनोधैर्य खालावले आहे. असे खालावलेले मनोधैर्य व मागासलेपणा यांमुळे ही जमात जातीय व धार्मिक राजकारणाकडे खेचली गेली. राष्ट्राच्या प्रगतीसाठी इतर धर्मांच्या बांधवांबरोबर प्रयत्न न करता ही मंडळी दूर राहण्याचा प्रयत्न करू लागली. अशा परिस्थितीत धार्मिक व जातीय वृत्तपत्रे दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहेत. ही वृत्तपत्रे काही विधायक कार्य तर करीत नाहीतच परंतु लोकांच्या भावना भडकविण्याचे विघातक कार्य मात्र आंधळेपणाने करीत असतात. आपली दुःखे अवास्तव व भडक स्वरूपांत मांडणे, आधुनिकतेची कोणतीही चळवळ असो तिला विरोध करणे, या आणि अशा गोष्टी राष्ट्राला धोकादायक तर आहेतच, परंतु खुद्द मुस्लिम समाजाचेसुद्धा त्यात नुकसान आहे, हे या वृत्तपत्रांच्या लक्षात येत नाही. 'दावत', 'मिदा–इ–मिल्लत', 'जिंदगी', 'तजल्ली' व 'रेडियन्स' इत्यादी अशा प्रकारची वृत्तपत्रे होत. यांतील बहुतेक पत्रे 'जमाते इस्लामी'च्या विचारसरणीचा प्रचार करतात. लोकशाही घटनेने दिलेला मुद्रणस्वातंत्र्याचा हक्क जमाते इस्लामी पुरेपुर उपभोगते पण त्या वृत्तपत्रांतूनच लोकशाही निवडणुका आदीमध्ये भाग घेऊ नका असा उपदेश आपल्या वाचकांना करीत असते, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मुस्लिमांमधील फार मोठे अज्ञान अशा प्रकारच्या वृत्तपत्रांना पार्श्वभूमी म्हणून उपयोगात येते. मुनीर आयोगासमोर साक्ष देतांना जमातेचे संस्थापक–अध्यक्ष काय म्हणाले ते प्रत्येक मुसलमानाने लक्षात घेण्याजोगे आहे. ते म्हणतात, "भारतातील मुसलमानांना शूद्रासारखे वागविले तरी माझी हरकत असण्याचे कारण नाही. त्यांना मनुप्रणित कायद्याखाली वागवून राज्ययंत्रणेमधील त्यांचा हक्क हिरावला अथवा नागरिकत्वाचा अधिकार नाकारला तरी मला दुःख व्हायचे नाही...." यावरून स्वतःला मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी म्हणविणारे हे 'पुढारी' समाजाचे हित करण्यापेक्षा अहितच करीत असतात, हे लक्षात येईल. दि. २५–९–१९६४ च्या 'मार्गदीप'च्या अंकात संपादक लिहितात :

"आपल्याला जातीय ऐक्य हवे असल्यास हिंदू, मुसलमान, शीख, बौद्ध इ. च्या स्वतंत्र संघटना तयार करायला हव्या आहेत.......हिंदू-मुस्लिमांच्या स्वतंत्र जातीय संघटना केल्याशिवाय या जातींमध्ये ऐक्य होणे कदापि शक्य नाही. प्रत्येक धार्मिक जमातीला स्वतंत्र राजकीय पक्ष असणे आवश्यक आहे." हे लिखाणच 'जमाते इस्लामी' मुस्लिमांची मित्र आहे की शत्रू आहे हे स्पष्ट करते. अशा प्रकारचे बेजबाबदार आणि घातक लिखाण अल्पसंख्यांकामध्ये जातीयतेचे विष पसरवते आणि परिणामस्वरूप बहुसंख्याकांमध्येसुद्धा या प्रकारची भावना दृढ होऊ लागते. त्याचा परिणाम देशामध्ये दुफळी माजण्याशिवाय दुसरा कोणता होणार ?

४ : धार्मिक नसूनही जातीय असणारी वृत्तपत्रे : ही वृत्तपत्रे सर्व मुस्लिमांना एका व्यासपीठावर आणून अशा प्रकारे फुटीर प्रवृत्ती निर्माण करण्याच्या प्रयत्नांत असतात. 'शौर' पत्र हे उदाहरण म्हणून सांगता येईल. ही पत्रेसुद्धा आपल्या दु:खाचा अवास्तव डांगोरा पिटून सहानुभूती मिळवीत असतात. आपल्या क्षुद्र स्वार्थासाठी समाजाचे नुकसान करण्याव्यतिरिक्त दुसरे काही यांच्या हातून होत नसते. मुस्लिमांचे हे जातीय राजकारण त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी किंवा बहुसंख्याकांची सहानुभूती मिळविण्यासाठी आता उपयोगी नाही, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. बहुसंख्याकांच्या शुभेच्छाच केवळ मुस्लिमांची परिस्थिती सुधारण्यासाठी उपयोगात येतील. त्या मिळविण्यासाठी या समाजाने प्रयत्न केले पाहिजेत.

५. निधर्मी (Secular) वृत्तपत्रे : अशी वर्तमानपत्रे धार्मिक किंवा जातीय वर्तमानपत्रांइतकी निर्भीड नसतात, हे कटू सत्य आहे. सर्वसाधारणत: ही सेक्युलर पत्रे सरकारी धोरणाचा पुरस्कार करतात आणि सत्ताधारी पक्षावर टीका करण्याचे नैतिक धैर्य त्यांच्यांत नसते. त्यामुळे त्यांना लोकप्रियता मिळत नाही. 'इन्किलाब', 'सियासत', 'उर्दू प्रेस' व 'जम्हुरियत' इ. वृत्तपत्रे सेक्युलर म्हणून दाखविता येतील.


उर्दू पत्रांतील जातीय प्रचाराची नोंद अन्य भाषिक पत्रे ताबडतोब घेतात. त्यामुळे त्या भाषेच्या वाचकांमध्ये अशी भावना निर्माण होते की, सर्व मुसलमान जातीय व संकुचित विचारसरणीचे आहेत. ही अन्य भाषिक वृत्तपत्रे मुस्लिम वृत्तपत्रांमधील एक बाजू लक्षात घेतात पण निधर्मवादी पत्राची दखलसुद्धा घेत नाहीत. त्यामुळे मुस्लिमेतरांच्या मनांत मुस्लिमांविषयी गैरसमज तर वाढतातच, परंतु असे दुर्लक्ष केल्यामुळे या समाजामध्ये एक लहानसा का होईना पण जो काही निधर्मवादी विचारप्रवाह आहे त्याला प्रोत्साहन न मिळाल्याने तो कुंठित होतो.

◻ ◻ ◻

लोकमान्य टिळकांची कितीतरी चरित्रे आजपर्यंत प्रकाशित झाली आहेत. ‘ भारतीय असंतोषाचा जनक ’ हे बिरुद सार्थ अभिमानाने मिरवू शकणाऱ्या त्या धीरोदात्त व्यक्तिमत्त्वाचे यशाशवती दर्शन घडवण्याचे कित्येकांनी प्रयत्न केले आहेत. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील पहिला ‘ लोकमान्य ’ सेनानी म्हणून भारतीय इतिहासात टिळकांचे जे आगळे महत्त्वपूर्ण स्थान आहे. ते ध्यानात घेतल्यास त्यांच्या चरित्रलेखनाचे असे विविध प्रयत्न होणे अत्यत स्वाभाविक आहे. पण त्या सर्व प्रयत्नांमध्ये आपल्याला अनेक विश्री आणि ठळक वैशिष्ट्यांनी उठून दिसते ते श्रीयुत धनंजयराव कीर यांनी लोकमान्यांचे इंग्रजीतून लिहिलेले विचारप्रवर्तक चरित्र. नुकतीच त्या चरित्राची दुसरी आवृत्तीही प्रसिद्ध झाली आहे.

---

अमृतबझार पत्रिका
दि संडे ट्रिब्यून
संडे स्टँडर्ड
हिंदू
आदी वृत्तपत्रांनी गौरवलेले



आनंद हर्डीकर

# टिळक चरित्र

---

चरित्रलेखन हा जसा इतिहासलेखनाचा एक भाग आहे तशीच ती कलानिर्मितीही आहे. चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व रंगवण्यासाठी लिहिल्या जाणाऱ्या चरित्रांतून चरित्रलेखकाचेही व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होत असते याची जाणीव नसल्यामुळे, कित्येक वेळा चरित्रलेखन म्हणजे कालक्रमानुसार घटनांची सुसंगत जुळणी करून ठेवणे होय, असा भ्रम जोपासणारी काही चरित्रे प्रसिद्ध होतात, पण ती यशस्वी होऊ शकत नाहीत. चरित्रनायकाच्या मोठेपणाचे वैशिष्ट्य कशात आहे त्याची मूलगामी चिकित्सा केली, त्या महामानवाच्या विचारांची उत्क्रांती कशी होत गेली याचे दिग्दर्शन केले म्हणजे मग चरित्राला कोठे आकार येतो,

रंगरूप येते ! धनंजयरावांना हे तंत्र फार चांगले जमले आहे. चरित्रनायकाकडे एका आदराच्या पण थोड्याशा अलिप्त भावनेने, संशोधकाच्या तटस्थ दृष्टीने पाहू शकणारे त्यांच्यासारखे चरित्रकार भारतीय वाङ्मयाच्या क्षेत्रात फारच थोडे आहेत. नाहीतर आपली दृष्टी चरित्रनायकाच्या कार्यावर लादून त्याच्या जीवनाचे विकृत दर्शन घडवणारी चरित्रे लिहिणारे किंवा अतिरेकी भक्तीच्या आहारी जाऊन चरित्रनायकाला अतिमानवी पातळीवर नेऊन बसविणारे आणि त्याच वेळी त्याच्या विरोधकांना हेतुपुरस्सर नामशेष करू इच्छिणारे चरित्रकार आपल्याकडे कमी नाहीत. खुद्द धनंजयरावांनीच प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे टिळकांच्या इतर चरित्रकारांपेक्षा त्यांची दृष्टी कितीतरी भिन्न आहे. टिळकांनी या देशाच्या हितासाठी जे काही राजकारण आखले ते अमलात आणण्याचा कधी यशस्वी, तर कधी अयशस्वी असा काही प्रयत्न केला आणि थंडगार होऊन पडलेल्या या मृतप्राय समाजाला स्वराज्याच्या दिव्य महामंत्राने जी चेतना दिली तिचे स्वरूप आणि महात्मा गांधींनी टिळकांच्या निधनानंतर अखिल भारतीय काँग्रेसच्या नेतेपदी आरूढ होऊन केलेले राजकारण, त्यांनी स्वीकारलेले मार्ग यांचे स्वरूप अतिशय मिळतेजुळते आहे. जणू गांधीजींच्या अहिंसावादी, सत्याधिष्ठित राजकारणाचा खुद्द टिळकांनीच पाया घातला होता, असे दर्शविणारी चरित्रे पुष्कळ आहेत. पण त्या साऱ्या चरित्रांपेक्षा धनंजयरावांनी लिहिलेले चरित्र फार वेगळे आहे. मार्गापेक्षा साध्यावर लक्ष केंद्रित करणारा एक नेता म्हणून टिळकांचे व्यक्तिमत्त्व त्यांनी रंगविलेले आहे. साध्य-पूर्तीपेक्षाही मार्गांच्या शुचितेवरच भर देणारा नेता म्हणून गांधीजींचे इतिहाससिद्ध असे जे व्यक्तिमत्त्व आहे त्यापेक्षा देशस्वातंत्र्याकरिता अनेक प्रकारे प्रयत्न करणारा, सशस्त्र क्रांती आणि सनदशीर चळवळ या दोन्ही मार्गांचा पुरस्कार करून स्वातंत्र्याचा मंत्र घराघरांत पोहोचविणारा एक असंतुष्ट नेता म्हणून टिळकांचे असणारे व्यक्तिमत्त्व कितीतरी वेगळे आहे आणि तो फरक स्पष्टपणे रंगवण्यात धनंजयराव कीर हे अतिशय यशस्वी झाले आहेत. गांधींनी टिळकांच्या आठवणीत टिळकांशी त्यांच्या झालेल्या संभाषणांचा वृत्तांत दिला आहे. टिळकांचा गांधीजींवर किती विश्वास होता याचे वर्णन करताना " I will sign anything that Gandhi suggests, because I have full-faith in him. I wish you every success and if you gain the popular year, you will find in me an enthusiastic supporter. " असे ते म्हणतात.

हे टिळकांचे वाक्य गांधीजींनी उद्धृत केले आहे खरे. पण टिळकांचे तत्त्वज्ञान सांगणारा त्याच संभाषणातला दुसरा भाग गांधीजींनी कदाचित दुर्लक्षाने, पण बहुधा हेतुतः गाळलेला आहे हे धनंजयरावांनी निर्भीडपणे दाखवून दिले आहे. टिळकांनी गांधीजींच्या प्रयत्नांना पाठिंबा दर्शविला खरा, पण तो पाठिंबा ' कुठल्याही मार्गाने का होईना, या देशाला स्वराज्याचा जन्मसिद्ध हक्क प्राप्त झालाच

पाहिजे ' असा ध्यास लागलेल्या नेत्याचा पाठिंबा होता. गांधीजींचाच मार्ग योग्य आहे, त्याच मार्गाने आपण स्वातंत्र्य मिळविले पाहिजे अशी एकांगी श्रद्धा बाळगण्याच्या आणि त्या श्रद्धेपोटी गांधीजींचा अनुयायी बनणाऱ्या नेत्याचा तो पाठिंबा नव्हता. खुद्द टिळकच गांधींना असे म्हणाले, "I consider an armed revolt also constitutional if anyone were to assure me that armed revolt would be successful to the extent of even eight annas in the rupee, I would start the revolt trusting God to give success to the extent of the remaining eight annas."

या वाक्यावरून टिळकांचे जे व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर उभे राहते तेच इतर अनेक प्रसंग रंगवून धनंजयरावांनी सुस्पष्टपणे चित्रित केलेले आहे टिळकांनी आपल्या आयुष्यात पक्ष बदलले, काँग्रेसचा मार्ग योग्य वाटेनासा झाल्यावर अ‍ॅनी-बेझंटबरोबर सहकार्य करून होमरूल पक्ष स्थापला. काँग्रेसने सहकार्याची अपेक्षा केल्यावर ते परत काँग्रेसमध्ये गेले पण क्रांतिकारकांना त्यांनी कधी विरोध केला नाही. सनदशीर राजकारणाच्या जोडीलाच सशस्त्र लढ्याची तयारी या देशाने करावी असेच त्यांच्या धोरणाचे सूत्र होते आणि म्हणूनच जर्मनीतील भारतीय क्रांतिकारकांनी एका महाराष्ट्रीयाच्या बरोबर सुमारे साठ हिरे क्रांतिकार्याच्या मदतीसाठी म्हणून टिळकांकडे पाठविले होते. स्वार्थत्यागी आणि दक्ष अशा लोकमान्यांनी त्या हिऱ्यांना स्पर्शही न करता गंगाधरराव देशपांडे या त्यांच्या एका जवळच्या अनुयायाकडे ते पाठविले आणि बेळगावच्या मराठा इन्फंट्रीतील महत्त्वाच्या लष्करी अधिकाऱ्यांना वळवून घेता यावे म्हणून त्या हिऱ्यांचा उपयोग करण्यात यावा असे सुचविले. हे काम फारच अवघड असल्यामुळे पुढे ते हिरे विकून मिळालेले पैसे ज्या माणसाने आपला जीव धोक्यात घालून ते हिरे जर्मनीहून आणले होते त्याला देऊन टाकण्यात आले. ही महत्त्वाची गोष्ट धनंजयराव कीर यांनी या पुस्तकात वर्णन केली आहे.

टिळकांची तुलना गांधीजींसारख्या स्वातंत्र्य लढ्यातील दुसऱ्या मोठ्या नेत्याशी करीत असताना धनंजयराव कीर यांनी दाखवलेली सूक्ष्म वृत्ती खरोखरच दुर्मीळ आणि वाखाणण्याजोगी आहे. खिलाफत चळवळीला विरोध करताना "Never seek to introduce thuology in to our politics" असे म्हणणारे, 'मुसलमानांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांचे प्रियाराधन करू नका,' 'राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात धार्मिक आणि परकीय राजकारणातले विषय आणू नका,' असे सांगणारे टिळक, लखनौ करारामुळे मुसलमानांना जास्त प्रतिनिधित्व देण्यात आल्यानंतर 'ब्रिटिशांविरुद्ध चाललेला लढा दुरंगीच राहावा. तो तिरंगी सामना होऊ नये म्हणून मी साऱ्या भारताचे प्रतिनिधित्व मुसलमानांकडे वा फक्त राजस्थान्यांकडे वा बंगाल्यांकडे सुपूर्त करायला तयार आहे,' असे जाहीर करणारे

टिळक हे गांधीजींपेक्षा कसे वेगळे होते हे धनंजयरावांनी अवघ्या दोन पानांत ज्या रीतीने दाखवून दिले आहे ती रीत खचितच एका ज्येष्ठ आणि श्रेष्ठ चरित्रकाराची आहे. नेताजींनी 'The Indian Struggle' या आपल्या पुस्तकात "Gandhiji's plan in Indian History" या प्रकरणामध्ये गांधीजींच्या नेतृत्वासंबंधी जे चिकित्सक आणि मर्मभेदी विचार मांडलेले आहेत आणि त्यांतून सुभाषचंद्रांची जी दुर्मीळ चिकित्सक वृत्ती स्पष्ट होत आहे तिचेच प्रत्यंतर धनंजयरावांनी पुन्हा एकदा जाणकारांना आणून दिले आहे–

## चिकित्सक चरित्रलेखन

—— केवळ याच चरित्रात नव्हे, तर धनंजयराव कीर यांनी जी इतर चरित्रे लिहिली आहेत त्यांतही त्यांची ही वृत्ती स्पष्ट दिसून येते. महाराष्ट्र शासनाने नुकतेच त्यांचे मानधन बंद केलेले आहे. जेव्हा भारताच्या या थोर चरित्रकाराला त्याच्या पुढील कार्यासाठी मदत म्हणून व आतापर्यंतच्या कार्याचा गौरव म्हणून मानधन देण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरविले त्या वेळी आवश्यक ती सारी माहिती धनंजयरावांनी सरकारकडे पाठविली होती. अर्जाचा मसूदा परत भरून पाठवा असे सरकारने कळवताच धनंजयरावांनी स्पष्ट शब्दांत नकार कळविला. परिणामी त्यांचे मानधन बंद करण्यात आहे. परिणामांची पर्वा न बाळगता निर्भिडपणे आपली मते मांडीत राहणे हे चरित्रकाराचे ब्रीद असावे लागते. धनंजयरावांनी ते सतीचे वाण हातात घेतलेले आहे. त्यांनी आतापर्यंत जी चरित्रे लिहिली त्यांवरूनही त्यांची हीच वृत्ती स्पष्ट होते. प्रसिद्धीच्या झगमगाटात असणाऱ्या नेत्यांचे लांगूलचालन करण्याच्या हेतूने त्यांची गुणगौरवपर चरित्रे लिहिण्यापेक्षा लोकप्रियतेचे लेणे न लाभलेल्या गुणी नेत्यांची निःपक्षपाती चिकित्सक चरित्रे लिहिण्याचा त्यांचा उपक्रम खरोखरच स्तुत्य आहे. वीर सावरकर, बाबासाहेब आंबेडकर किंवा महात्मा फुले या महापुरुषांची चरित्रे लिहून त्यांनी खरोखरच मोलाची कामगिरी बजावली आहे. डॉ आंबेडकरांच्या चरित्रात तर आंबेडकरांच्या चांगल्या पैलूंचा पुरस्कार करीत असताना, त्यांच्यातील लढाऊ क्रांतिकारकाचा गौरव करीत असताना 'गांधींनी अस्पृश्यांसाठी शाब्दिक आश्वासने व वरदाने देण्यापेक्षा प्रत्यक्षात अधिक काहीही केलेले नाही' हा आंबेडकरांचा आरोप इतक्या सहजपणे त्यांनी सिद्ध केलेला आहे की जाणकार वाचक क्षणभर स्तंभित होतो व नंतर कीर यांच्या लेखणीची त्याला मोहिनी पडते. 'War with Gandhiji,' 'Truce' आणि 'The real path' ही तीन प्रकरणे म्हणजे आंबेडकरांच्या जीवन संघर्षाचे मूर्तिमंत चित्रण करणारी शब्दचित्रेच आहेत. असो.

टिळकांच्या चरित्रात इतिहासाचा पार्श्वभूमीसारखा वापर करून व्यक्तीला प्रकाशाच्या झोतात ठेवण्याचे चरित्राचे तंत्र त्यांनी कौशल्याने वापरलेले आहे. एखाद्या काळात घडलेल्या घटनांचा इतिहास लिहिणे आणि एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचा इति-

हास लिहिणे यांत फार फरक आहे. नेपोलियनचा सुप्रसिद्ध चरित्रकार 'एमिल लुडविग्' याने हा फरक त्याच्या चरित्राच्या शेवटी थोडक्यात पण मुद्देसूद रीतीने वर्णिलेला आहे. व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास ज्या वैशिष्ट्यांनी युक्त असावा लागतो त्या वैशिष्ट्यांनी धनंजयरावांनी लिहिलेली चरित्रे आणि विशेषत: टिळकांचे चरित्र परिपूर्ण आहे. त्या व्यक्तीच्या आयुष्यात कालक्रमानुसार घडलेल्या घटनांत त्या व्यक्तीचा भाग किती होता, त्याला मिळालेल्या यशात त्याचे श्रेय किती, त्याला आलेल्या अपयशात त्याची जबाबदारी किती, एवढेच वर्णन करून चरित्रकार जर पूर्णविराम देत असेल तर ते चरित्र अपयशी मानावे लागेल. 'एक महापुरुष जन्माला आल्यानंतर विधाता त्या महापुरुषाचा साचा (Mould) मोडून टाकतो' असे इमर्सनने म्हटले आहे. म्हणूनच प्रत्येक महापुरुष हा दुसऱ्या महापुरुषापेक्षा वेगळा असतो, आगळा असतो. त्याचे ते आगळेपण स्पष्ट रीतीने वाचकाच्या मनावर ठसविले गेले पाहिजे. तसे ते ठसविले गेले तरच चरित्रकार यशस्वी ठरला असे म्हणण्यास हरकत नाही. महामानवाच्या आगळेपणात ज्याप्रमाणे त्याच्या गुणांचे सोने असते त्याचप्रमाणे थोड्या प्रमाणात का होईना दोष-दुर्गुणांचे, उणिवांचे तांबेही त्या दागिन्यांत मिसळलेले असते. ते दोष-दुर्गुण त्या महामानवाच्या उदात्त अशा व्यक्तिमत्त्वावरचे कधी कधी काजळाच्या तिटेसारखे डाग असतात तर कधी कधी त्या डागांनी तत्कालीन समाजाला ग्रहण लागलेले असते. महापुरुषांच्या गुणांबरोबरच त्यांच्यातील दोष-दुर्गुणांचे, उणिवांचे तितक्याच स्पष्टपणे दर्शन घडविणे हे चरित्रकाराचे कर्तव्य असते ! कारण त्या माणसाच्या आयुष्यातील चुकांचा किंवा त्याच्या दोषांच्या परिणामांचा जर भावी पिढ्यांनी अभ्यास केला तर महापुरुषांच्या गुणाची भक्ती करून त्यांना जितका फायदा होणारा असतो तितकाच फायदा या दोषांमुळेही होण्याची शक्यता असते. धनंजयराव कीर यांनी चरित्रनायकाच्या दोषांचेही वर्णन करण्याचे कर्तव्यसुद्धा यथायोग्य रीतीने बजावले आहे. ज्याप्रमाणे आंबेडकरांच्या जीवनसंघर्षाचे चित्र रंगवताना त्यांनी आंबेडकरांचा गौरव केला आहे त्याचप्रमाणे भारताची फाळणी होण्यास काही हरकत नाही असे मत मांडणाऱ्या आंबेडकरांचा त्यांनी योग्य तो समाचारही घेतला आहे. आंबेडकरांना त्या वेळी कोणीही प्रभावीरीत्या उत्तर देऊ शकले नाही ही वस्तुस्थिती निवेदन करीत असतानाही आंबेडकरांनी फाळणीचा केलेला पुरस्कार अयोग्य होता हे नमूद करण्यास त्यांनी मागेपुढे पाहिलेले नाही. हे जसे आंबेडकरांच्या बाबतीत तसेच टिळकांच्याही बाबतीत ! आपल्या नि:पक्षपाती वृत्तीने टिळकांचे चरित्र अभ्यासत असताना कीरांना जे काही हिणकस आढळले तेही त्यांनी मोकळ्या मनाने चरित्रात अंतर्भूत केलेले आहे. नेपोलियन पराभूत होऊनही जसा फ्रान्सचा महापुरुष राहू शकतो त्याचप्रमाणे आजच्या काळात प्रतिगामी वाटणाऱ्या अशा अनेक गोष्टी टिळकांनी केल्या असल्या, काही वेळा ते खालच्या पातळीवरही गेलेले असले तरीही राजकीय क्षेत्रातले

समाजजागृतीचे त्यांचे कार्य इतके महान आहे की त्यांचे माहात्म्य भारतीय इतिहासातून कोणालाही नाहीसे करता येणार नाही. टिळकांचे दोष विचारात घेऊनही टिळक मोठे आहेत हे दाखविणे चरित्रकाराच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचे आणि योग्य आहे. टिळकांचे दोष आणि त्यांच्या विरोधकांचे गुण लपवून टिळकांचे मोठेपण सिद्ध करण्यापेक्षा त्यांच्या विरोधकांचे गुणदोष आणि टिळकांचे गुणदोष ह्यांचेही यथार्थ चित्रण करणे हेच जास्त श्रेयस्कर आहे, असे कीर यांनी मानलेले आहे. त्यातच कीर यांचे यश आणि परिणामी मोठेपण सामावलेले आहे.

### जसे होते तसे...

यंत्रशास्त्रावर एक अत्युत्कृष्ट पुस्तक लिहिणारे टिळक, प्रो. केरोपंत छत्रे या आपल्या गुरूंचे नाव आपल्या गणितातल्या अलौकिक प्रगतीने सर्वत्र गाजवणारे टिळक, आजारी मित्रांची प्रेमळ मातेच्या कणवेने शुश्रूषा करणारे टिळक, ही जशी टिळकांच्या व्यक्तिमत्त्वातली जमेच्या बाजूची अंगे धनंजयराव कीर यांनी चरित्रात वर्णन केलेली आहेत, त्याप्रमाणे आगरकरांवर समाजसुधारणेच्या त्यांच्या क्रांतिकारक मतांबद्दल सडेतोड टीका करणारे टिळक, त्या सुधारणांचे महत्त्व कमी लेखणारे टिळक, ब्राह्मणेतरांनी वेदांचे अध्ययन करू नये असे सांगणारे टिळक, अस्पृश्यतेचा अवलंब आपल्या दैनंदिन जीवनात आपण करणार नाही अशा प्रतिज्ञापत्रकावर सही करायला नकार देणारे टिळक, पुन्हा धर्मांतर करून हिंदुधर्मात आलेल्या ब्राह्मण तरुणाबरोबर जेवायला नकार देणारे टिळक, इंदूरचे महाराज शिवाजीराव होळकरांनी दिलेल्या सातशे रुपयांतले चारशे रुपये आगरकरांना देण्याबाबत अप्रामाणिकपणा दाखवणारे टिळक ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातली काळी बाजूही धनंजयरावांनी या चरित्रात आवश्यक तेवढी निश्चितच रंगवलेली आहे. राजकीय स्वातंत्र्यापुढे त्यांनी सामाजिक सुधारणा दुय्यम मानल्या असल्या तर काहीच हरकत नव्हती; पण सामाजिक सुधारणा या जणूकाही राजकीय स्वातंत्र्याच्या मुळावरच येत आहेत असे मानून सुधारकांना त्यांनी जो विरोध केला तो अयोग्य होता असेच आज नाइलाजाने म्हणावेसे वाटते. राजकीय सुधारणा होऊनही भारतीय समाजाचे दोषदुर्गुण तसेच राहिल्यामुळे आज जे चित्र आपल्याला दिसते आहे त्याचा विचार करता टिळकांचा राजकीय सुधारणांबाबतचा पक्षपाती हट्ट रास्त नव्हता असेच म्हणावे लागते. स्वातंत्र्य येऊनही सामाजिक समतेचा लढा लढायला आज लोक फारसे उत्सुक दिसत नाहीत, त्याचे मूळ टिळकांनी आपल्या उत्तुंग अशा कर्तृत्वाने झाकळून टाकलेल्या सुधारकांच्या अपयशात आहे. परकीय राज्यकर्त्यांवर टीका करताना, आपल्या दुर्दशेचे खापर त्यांच्या साम्राज्यवादाच्या माथी फोडताना आणि त्यांच्या जोखडातून स्वदेश मुक्त करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन कार्य करताना टिळक हे विसरले की ' सामाजिक सुधारणा आधी करूया, ' असे म्हणणाऱ्या सुधारकांनाही देशाचे भले व्हावे याचाच ध्यास लागून राहिलेला होता. आपला समाज

बलवान व्हावा, बुद्धिनिष्ठ व्हावा, तो परंपरेचा गतानुगतिक अनुयायी राहू नये, बदलत्या काळाची आव्हाने स्वीकारण्याचे सामर्थ्य त्यात यावे याच हेतूने सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत, असे मत ते सुधारक आग्रहाने पुरस्कारीत होते हे टिळकांनी जाहीररीत्या कधी मान्यच केले नाही. टिळकांना सुधारकांचे सारे विचार पटत नव्हते अशातलाही भाग नव्हता. सुधारकांच्या कित्येक मतांना खासगी संभाषणात टिळकांनी पाठिंबा दिल्याचे पाहून त्यांचे कित्येक मित्र आश्चर्यचकित होत असत आणि स्वतःला पटलेली मते जाहीररीत्या सांगायला टिळक का कचरतात हा प्रश्न त्यांना पडत असे. एकदा हा प्रश्न त्यांच्या मुलीनेच त्यांना विचारला तेव्हा समाजापासून दूर जाण्याची इच्छा नसल्यामुळे मी जाहीररीत्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करू शकत नाही असे टिळकांनी उत्तर दिले; पण हे उत्तर म्हणजे टिळकांच्या वर्तनाचे योग्य समर्थन होत नाही. त्यांना सुधारकांचे विचार जर पटत होते आणि जाहीररीत्या त्या विचारांचे समर्थन करण्याचे जर त्यांचे धाडस नव्हते, तर अशा प्रसंगी तटस्थ राहणे हेच त्यांच्या आणि समाजाच्या दृष्टीने जास्त श्रेयस्कर ठरले असते.. पण लोकमान्य टिळकांनी दादाभाई नौरोजी किंवा ना. गोखले यांच्यासारखी या बाबतीत तटस्थता न स्वीकारता स्थितिप्रिय समाजाची अतिरेकी वकिली केली. सुधारकांना समाजशत्रू मानले. त्यांच्यावर टीकेचा भडिमार केला आणि पर्यायाने आपली शक्ती वाया घालविली. टिळक चरित्रातील हा सारा भाग जसा कीर यांनी दाखविला आहे त्याचप्रमाणे काही सुधारकांच्या प्रयत्नांमागची प्रेरणा समाजाबाबतच्या न्यूनगंडातून कशी निर्माण झाली होती हेही त्यांनी उत्कृष्ट रीतीने आणि सडेतोडपणे दाखवून दिले आहे; आणि असे सूचित केले आहे की, राजकीय सुधारणांच्या बरोबरच सामाजिक सुधारणाही व्हाव्यात अशा दृष्टिकोणाने जर स्वतः टिळक प्रेरित झाले असते आणि इतर सुधारकांनाही जर त्यांनी तीच स्फूर्ती दिली असती तर समाजाचे चित्र साऱ्याच क्षेत्रांत पूर्णतया पालटवून टाकण्यास लोकमान्यांचा व सुधारकांचा संगम खचितच समर्थ ठरला असता. पण या समाजाच्या दुर्दैवाने असे काही झाले नाही.

## छायाचित्रकाराची भूमिका

एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचे चित्रण करीत असताना तत्कालीन समाजाचेही चित्रण पार्श्वभूमीच्या स्वरूपात व्हावे लागते, तरच चरित्राला छायाचित्राचे स्वरूप येऊ शकते. चरित्रकार हा एक अर्थाने छायाचित्रकारच असल्यामुळे ती पार्श्वभूमी योग्य त्या स्वरूपात मांडणे हे त्याचे कर्तव्यच ठरते. या दृष्टिकोणातूनसुद्धा कीर यांनी लिहिलेले लोकमान्यांचे चरित्र यशस्वी झाले आहे. त्यांच्या आयुष्यातील साऱ्या घडामोडी वर्णन करीत असतानाच त्या काळी भारतात सर्वत्र जनजागृतीच्या आंदोलनाचे विविध प्रकारे जे पडसाद उमटत होते त्याचेही दर्शन कीर यांनी घडविलेले आहे. लॉर्ड कर्झनचा वध करण्याचा कट करण्यात आला होता आणि अरविंद घोष

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, चारुचंद्र दत्त या भारतीय समाजापुढील मोठ्या व्यक्तींचाच त्यात हात होता असे नव्हे तर बॅरॉन ओककुरा (Baron Okakura) हा सुप्रसिद्ध कलावंतही त्यात सामील झाला होता. पण तो कट प्रत्यक्षात उतरू शकला नाही हे कीर यांनी नमूद केले आहे आणि त्या वेळी सशस्त्र क्रांतीसाठी, ब्रिटिशांच्या अन्यायाचा आणि जुलुमाचा सूड घेण्यासाठी हा देश आणि विशेषतः बंगाल प्रांत कसा तळमळत होता हे सूचित केले आहे. त्याचप्रमाणे गोपाळराव जोशी या विक्षिप्त स्वभावाच्या माणसाने ('आनंदी गोपाळ' मधील गोपाळराव) पंचहौद मिशनतर्फे रानडे, टिळक, गोखले आणि इतर काही नेत्यांना भाषणाच्या निमित्ताने बोलावून भाषणानंतर त्यांना चहा दिला. त्यामुळे नेत्यांच्यात जी गडबड माजली त्याचे आजच्या काळात अतिशय विनोदी वाटणारे वर्णनही धनंजयरावांनी मुद्दाम केलेले आहे. एका ख्रिश्चन घरात हिंदू नेत्यांनी जाहीररीत्या चहा घेणे या कल्पनेनेच त्या नेत्यांत किती गोंधळ उडाला होता! रानड्यांनी कपभर चहा न घेता एका चमच्याने फक्त एक घोटच घेतला, गोखले आणि इतर काही नेते निमूटपणे चहा प्याले; पण टिळकांनी मात्र जर आपणाला एका ब्राह्मणाच्या हातून चहाचा कप आणून दिला तर आपण तो अवश्य घेऊ असे सांगितले. गोपाळराव जोशी यांनी एके दिवशी ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याचे नाटक केले होते. काही दिवसांनी पुण्यातील ख्रिश्चनांसमोर बायबलमधील एका प्रकरणाचे वाचन करणे आणि ख्रिश्चन धर्मोपदेशकाकडून पाणी शिंपडून घेणे यामुळे ख्रिश्चन होत नाही हे सिद्ध करण्यासाठी हिंदू धर्मातील काही विधी जाहीररीत्या केले व हिंदू समाजालाही धक्का दिला होता, त्या गोपाळरावांच्या हातून टिळकांनी चहा घेतला नाही पण पंचहौद मिशनच्या स्वयंपाकघरातून गोपाळराव जोशांच्या 'हिंदू' भावाने आणून दिलेला चहा मात्र ते प्याले हा प्रसंग आज आपल्याला हास्यास्पद वाटेल. पण त्या काळाचे हुबेहूब चित्रण या प्रसंगातून घडत असल्यामुळे धनंजयरावांनी तो आपल्या चरित्रग्रंथात अंतर्भूत केला आहे आणि टिळकांच्या काळी जो समाज जसा उभा होता तो तसा चरित्रग्रंथात पार्श्वभूमीवर आणून बसविला आहे.

## उत्कृष्ट वाङ्मयकृती

थोडक्यात धनंजयरावांनी टिळकांचे लिहिलेले चरित्र एका अत्युत्कृष्ट वाङ्मयकृतीच्या रूपात भारतीय वाङ्मयाच्या दालनात सतत मानाने मिरवीत राहील असेच आहे. कलकत्त्याच्या 'अमृतबझार पत्रिके' पासून अंबाल्याच्या 'दि संडे ट्रिब्यून'-पर्यंत, मुंबईच्या 'संडे स्टँडर्ड' पासून मद्रासच्या 'हिंदू' पर्यंत साऱ्याच वृत्तपत्रांनी आणि वीर सावरकरांसारख्या वीर पुरुषानेही धनंजयरावांनी लिहिलेले हे चरित्र एकमुखाने नावाजले आहे, ते यामुळेच! चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा एकच एक ठसा उमटवण्यात जसे ते यशस्वी झाले आहेत त्याचप्रमाणे त्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू निःपक्षपाती वृत्तीने रंगवण्यातही ते यशस्वी झाले आहेत. टिळक जसे होते

तसेच कीर यांनी रंगविले आहेत. आपला दृष्टिकोण कीर यांनी टिळकांवर लादलेला नाही. शस्त्रांच्या कारखान्यांकरिता नेपाळमध्ये खाडीलकरांसारख्या आपल्या अनुयायाकरवी प्रयत्न करणारे टिळक, विवेकानंदांच्या बरोबर संन्यासाश्रमावर चर्चा करणारे आणि विवेकानंदांची शंकराचार्यांबरोबर तुलना करून त्यांचा गौरव करणारे टिळक, गीतेच्या मननात गुंगून जाणारे टिळक आणि कारावासासारखी आपत्ती समोर उभी ठाकलेली असतानाही धीरोदात्त वर्तन करणारे टिळक, सुरतेच्या काँग्रेसमध्ये निश्चयाचा महामेरू होऊन उभे ठाकणारे टिळक, आणि खुद्द न्यायासनालाही त्याच्या मर्यादांची जाणीव करून देणारे टिळक, वैदिक संशोधनात मोलाची भर घालणारे टिळक आणि भारतीय वृत्तपत्रसृष्टीतील एका प्रभावी युगाची नांदी करणारे टिळक ही सारी रूपे टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा आपल्यावर उमटवून जातात. 'लीग ऑफ नेशन्स' बद्दलची त्यांची मते, बोल्शेव्हिक क्रांतीबाबतचे त्यांचे विचार यांनाही या पुस्तकात कीर यांनी स्थान दिलेले आहे. टिळकांचे मित्र आणि टिळकांचे शत्रू यांचीही थोडक्यात पण सुस्पष्ट अशी चित्रे धनंजयरावांनी रेखाटली आहेत. टिळकयुगाची समाजावरची मोहिनी टिळकांच्या मृत्यूच्या वेळी कशी स्पष्ट झाली हेही त्यांनी नमूद केले आहे. टिळकांच्या आयुष्यातले कौटुंबिक किंवा सामाजिक असे सारे प्रसंग वर्णन करताना आणि त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना कीर यांनी अशी काही भाषा वापरली आहे की लेखणीच्याऐवजी ते कुंचल्याच्याच वापर करीत असावेत, असे क्षणभर भासते. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे जिवंत चित्रण करण्यात भारताचा हा थोर चरित्रकार इतका यशस्वी झाला आहे, की ते लिहीत असलेल्या मानवेंद्रनाथ रॉय, पं. जवाहरलाल नेहरू व महात्मा गांधी या तीन महापुरुषांच्या चरित्रांची सारे जाणकार आतुरतेने वाट पाहत आहेत.

[ लोकमान्य टिळक – लेखक : धनंजय कीर – पॉप्युलर प्रकाशन – पृष्ठे : ४६३ – किंमत : वीस रुपये ]

## जाणे

वळणावरली
लाल माती
निवडुंगाच्या
झुडपाशी...
पाय गळाले
त्या वाटेशी.
कळली टोके
काटयाची –
झाली चुण् चुण्
मनाची
जाणीव झाली
त्यात मना
जायचेच ना
फिरून पुन्हा.

– मधुश्री

## रात्र आणि मी

ॲनिमिया झालेले
फिकट पांढरे चांदणे.
सावल्यांची, हलणारी लक्तरे
पानांत शिरून रडणारा वारा.
फांद्यांची हाडके, झाडे सांभाळणारी
पंखाच्या पांघरुणात
पाय दुमडून घेतलेली पाखरे.
काळी चौकट
त्या चौकटीत रुतलेला मी.
डोळ्यांवरती ताठलेल्या पापण्या
स्थिर झालेली बुबुळे
वेध घेत असताना;
झाल्या त्यांच्या खाचा.
मोजतो अजुन.
एक, दोन, तीन, चार
आकाशात चकाकणाऱ्या काचा.

– मधुश्री

## सुगंध

डोळ्याला दिसत नाही
स्पर्शांनी कळत नाही
नाकाला मात्र जाणवतो
असा सुगंध असतो फुलाचा
डोळ्याला दिसत नाही
स्पर्शांनी कळत नाही
आत्म्याला मात्र जाणवतं
असा वास असतो देवाचा

–ज. रा. जोशी

# आस्वाद

'जागे' या कवितेते 'मधुश्री' यांनी आयुष्यातला एक प्रभावी अनुभव अगदी सहजपणे, पण प्रभावीपणे रेखाटला आहे. प्रत्येकाच्याच आयुष्यात हे असे एखादे वळण येते. लाल मातीने भरलेले आणि निवडुंगाच्या काट्यांची चुणचुण मनाला जाणवून देणारे ! पाय गळून जातात तिथे. पुरे झाला हा प्रवास असे वाटायला लागते. पण पुन्हा फिरून जायचे असते. जावे लागणार असते. हा अनुभव या कवितेत अगदी सहजपणे जाणवलेला आहे. वळणावरची लाल माती आणि निवडुंगाचे झुडूप या प्रतिमांनी कवितेच्या प्रारंभीच एक स्पष्ट चित्र रेखलेले आहे. पाय गळाल्याची दमणूक, काट्यांची मनाला जाणवणारी चुणचुण व शेवटी पुन्हा झालेली हताश जाणीव, हे सगळे गडद रंग त्याच स्पष्ट चित्रात अलगद भरले गेले आहेत.

त्याच कवीच्या 'रात्र आणि मी' या कवितेत त्याहून गडद असे एक विषण्ण अनुभूतिचित्र आपल्याला दिसते. मनाची स्थिती खिन्नभीषण असताना चांदणी रात्र भेसूर बनते. चांदणे अॅनिमिया झाल्यासारखे फिकट फटफटीत वाटायला लागते. सावल्यांचा खेळ पाहून हलणाऱ्या लक्तरांची उदासवाणी आठवण होते. सगळ्या अस्तित्वालाच एका काळ्या चौकटीत रुतल्यासारखे वाटते. उदास, दुःखी कोंडमारा होतो मनाचा. मग डोळेही ताठरून जातात. सगळ्या भयचित्राचा वेध घेताना बुबुळांच्या खाचा बनून जातात. आकाशातल्या चांदण्यांचे सगळे सौंदर्य नष्ट होते. या गुदमरलेल्या निष्क्रिय अस्तित्वाच्या हिशेबी त्या केवळ चकाकणाऱ्या काचा उरतात. संथ लयीतल्या गोठलेल्या प्रतिमांनी 'मधुश्री' यांनी हा विलक्षण अनुभव साकार केला आहे.

'सुगंध' या छोट्याशा कवितेत जयंत रामकृष्ण जोशी यांनी एक आल्हादक साम्य पुढे मांडले आहे. नाकाला जाणवणाऱ्या पुष्पगंधाप्रमाणेच आत्म्याला जाणवणारा देवाचा वास असतो, ही कल्पना रम्य आहे. कवितेची रचना समतोल आहे. मोजक्या शब्दांत खूप अर्थ व्यक्त करणारी आहे. शेवटच्या दोन ओळींतली प्रतिमा अर्थवाही आहे.

— रसिक.

# राजम्मा

**विनोद कुलकर्णी**

त्या वयातही मला राजम्माचे सगळे काही आवडायचे. तिचे कपाळावरचे बंद्या रुपयाएवढे कुंकू. नाकातील ठळक चमकी. कोपरापर्यंत भरलेल्या गर्द हिरव्या बांगड्या. गळ्यात सोन्याची लखलखणारी बोरमाळ. काजळाने माखलेले डोळे. डुईवरून घेतलेला शालीन पदर.

राजम्माचा नवरा खणांचा व्यापार करी. आठवड्यातून तीन–चार दिवस तो फिरतीवर असे. खणांची गाठोडी घोड्यावर घालून तो बाजाराला बाहेर पडे, तेव्हा दारात उभी राहून राजम्मा त्याला निरोप देई. 'लवकर या' असे सांगे. माळावरच्या तांबडमातीच्या पायवाटेवरून घोडे सावकाशपणे पुढे जाई आणि राजम्माचे डोळे भरून येत. घरात वळताना पदराच्या शेवाने ती आसवे पुसे.

राजम्मा मग एकटी असे. गोठ्यात गाय आणि शेळी. पायात लुडबुडणारे बर्फाच्या गोळ्यामारखे शुभ्र मांजर. बाहेरच्या पिंजऱ्यात हिरव्या पंखांचा उदास पोपट. कधीही न केकाटणारा. परतताना राजम्माचा नवरा पोपटासाठी न विसरता पेरू-डाळिंबे आणी.

चार गावांचे बाजार आटोपून थकलेला नवरा अंधारल्यावर घरी येई. घोड्याला चरायला मोकाट सोडे. स्वत: अंगणात बाजले टाकून त्यावर आडवा होई. विडीचे झुरके घेत, केसाळ छातीवरून हात फिरवत चांदण्याकडे पाहत पडून राही. आत राजम्मा त्याला आवडणाऱ्या सांज्याच्या पोळ्या लाटत असे. त्यांचा खमंग वास घेत राही.

राजम्माच्या नवऱ्याचा विषय निघाला की, आई काही बोलत नसे. मूक असे. कधी पैशांची अडचण पडली की, बाबा त्याच्याकडून पाच–दहा रुपये उसने घेत. हे आईला पसंत नसे. तिच्या कपाळावर सूक्ष्म आठ्या पडत आणि स्वैपाकात मीठ किंवा तिखट कमीजास्त होई !

नवरा घरी नसला म्हणजे राजम्मा मला हाक मारी. पितळी उभट पेल्यातून गाईचे निरसे दूध प्यायला देई. नुकत्याच घुसळलेल्या ताकावरचे लोणी हातावर ठेवी आणि खडीसाखरेचा खडा देऊन सांगे, 'माझं एक काम ऐकशील ? बेलपत्र काढून आण, जा पत्रीबनातून. तिथं ताम्हण आहे ते घेऊन जा; आणि चार तुळशीची पानंही आण बरं का !"



राजम्माचा देवधर्म दांडगा. सोमवारी महादेव, मंगळवारी अंबामाई, शुक्रवारी लक्ष्मी, शनिवारी हनुमान. संध्याकाळी ती दारात पणती लावून ठेवी. तिचा मंद उजेड आमच्या अंगणात पडे. आम्ही जेवायला बसायच्या वेळी तिची घणघण घंटा ऐकू येई. वाढता वाढता आई म्हणे, " इतका देवधर्म करते मन लावून, पण अजून विचारीची कूस उजवत नाही. काय एकेकांचं दैव बघा ! "

बाबा यावर काही बोलू शकत नसत. घटाघटा घशाखाली पाणी उतरवत.

* *

एकदा बाजाराला गेलेला राजम्माचा नवरा चार–पाच दिवस फिरकेनासा झाला. परत येई तेव्हा त्याचे डोळे तांबरलेले असत. राजम्माने काही विचारले की, तो तुसडेपणाने ओरडे. काळजाला डागण्या देणारे त्याचे शब्द आमच्या घरात ऐकू येत. आई काम थांबवून, कान देऊन ते ऐके. धुराने धुमसणाऱ्या चुलीत फुंकणीने वारा घाली. तडतडणारा नवरा बऱ्याच वेळाने शांत होई. रात्रीच्या शांततेत गायीचे आर्त हंबरणे तेवढे ऐकू येई.

आताशा राजम्माच्या नवऱ्याची मला भीती वाटायला लागली होती. त्याच्या-

जवळ गेले, की कसलासा घाणरडा वास जाणवत होता. विडी ओढून ओढून त्याचे ओठ काळे पडले होते. त्याच्या कानावरचा केसही एकेक पिकू लागला होता. मी जवळ गेलो की, पूर्वी तो गमतीशीर गोष्टो सांगे. स्वतःच खळखळून हसे. हातापायांची बोटे कटकट मोडी; आणि कधी, कोकराला घ्यावे तसे मला कुशीत घेई. अलीकडे सगळे बंद. तो घुम्म बसून असे. आणि आतून राजम्माच्या बांगड्यांची किणकिण तेवढी ऐकू येई.

नवरा वस्तीला नसला की, सोबत म्हणून मी राजम्माकडे झोपायला जाई. थंडी वाजू नये म्हणून ती खरखरीत कांबळ्याला, ठेवणीचा वास असलेले लुगडे जोडून ते पांघरायला देई. बराच वेळपर्यंत भिंतीला टेकून ती बसून राही. काहीबाही बोले. चिमणीचा मंद पिवळा प्रकाश तिच्या सावळ्या चेहऱ्यावर, चमकीवर पडे. अशा वेळी ती फार सुंदर दिसे. कधी बसवेश्वराचे एखादे पद संथ आवाजात ती गाई. ते ऐकता ऐकता झोप केव्हा लागली कळत नसे.

रात्री केव्हा जाग आली तर राजम्मा अजून जागीच दिसे. या कुशीवरून त्या कुशीवर होत असे. काळोखात तिचे श्वास ऐकू येत. भिंतीवर मधूनच पाली चुकचुकत.

एका रात्री जागा झालो तो जाणवले, राजम्माची बोटे माझ्या चेहऱ्यावरून, केसांतून फिरताहेत. तिच्या अंगाची ऊब मला आवडली. मी आणखी जवळ सरकलो आणि तिच्या उभार वक्षात मी तोंड लपविले. राजम्माच्या काळजाची धडधड मला ऐकू आली.

* *

एके दिवशी, कसे कुणास ठाऊक, पिंजऱ्याचे दार जरासे उघडे राहिले. भिंतीवर टपून बसलेल्या मांजराने पिंजऱ्यावर झडप घातली. झडत चाललेले पंख फुलवून पोपट आतल्या आतच उडू लागला. जिवाच्या आकांताने केकाटू लागला. राजम्मा आतून येईपर्यंत म्हणजे मांजराने त्याला घट्ट पकडले होते आणि ते दारातून बाहेर पळत होते. तिने हातातले भांडे 'हुश् हुश्' करीत मांजरावर फेकले तसा त्याने अर्धमेला पोपट उंबऱ्याबाहेर टाकला; आणि ते शेपूट फुगवून समोरच्या निंबावर चढून बसले. पोपटाचे पंख विस्कटले होते. चोच आ वासली होती. त्याची इवलीशी छाती जोराने उडत होती. पाण्याचे चार थेंब राजम्माने चोचीत सोडायचा प्रयत्न केला, पण जगायचा शेवटचा क्षीण प्रयत्न करून पोपटाने मान टाकली.

आढ्यावरून लोंबकळणारा पिंजरा अजून हलत होता.

घरासमोरच्या बागेत खड्डा खणून मी त्या पोपटाला पुरले. सदाफुलीचे रोपटे तिथे लावले.

दोन दिवसांनी राजम्माचा नवरा घरी आला. येताना त्याने पोपटासाठी भेंड्या आणि डाळिंबे आणली होती. पोपटाचे कळल्यावर तो सुन्न बसून राहिला.

राजम्मावर तो भडकणार, असे मला वाटले, पण तसे काही झालें नाही. दुसऱ्या दिवशी राजम्माने ते डाळिंब मला खायला दिले. पण ते तुरट लागले. अर्धेमुर्धे खाऊन मी ते फेकून दिले.

तो रिकामा पिंजरा राजम्माने अडगळीत टाकून दिला.

* *

राजम्माचा नवरा अलीकडे दिवसभर खोकत पडून राही. आठवड्यातून एखाद्या दिवशीच बाजाराला जाई. पण येताना अगदीच मरगळून येई. जोशी डॉक्टर आठ दिवसांतून एकदा घरी येऊन इंजेक्शन देत. पथ्य पाळायला सांगत. राजम्माने काही विचारले तर काळजीचे कारण नाही असे म्हणत.

पण त्याची तब्येत दिवसेंदिवस ढळत होती. खोकल्याची उबळ एकदा आली, की आवरत नव्हती. वरचा श्वास वर आणि खालचा श्वास खाली राहत होता. छाती जोरजोराने धपापत होती. पापण्यांच्या फटीतून पाणी झिरपत होते. अशा वेळी त्याच्याकडे पाहवत नसे. राजम्मा त्याच्या उशागती बसून असे. काय करावे ते तिला कळत नसे.

तिच्या चेहऱ्यावरचे तेज लोपले होते. डोळे मालवत आल्यासारखे वाटत होते. आवाज पिचत चालला होता. आईकडे येऊन, टिपे गाळीत ती नशिबाला बोल लावी. आई तिला धीर देई. हे चाटण देऊन बघ, तो काढा देऊन बघ, असे माहीत असलेले उपचार सांगे.

आई कधीकधी बाबांना म्हणे, "हे असं होणारच. बाहेरचं पाप का कधी दडून राहतं? कधी ना कधी ते भोगायला पाहिजेच."

पुढे पुढे राजम्माच्या नवऱ्याला उठून बसणेही अवघड झाले. हाताचा आधार देऊन त्याला बाहेर न्यावे लागे. दिवसातून एकदा का होईना, दावणीला बांधलेल्या घोड्याच्या अंगावरून तो हात फिरवून येई. ओलसर डोळ्यांनी ते जनावर त्याच्याकडे पाही. त्याच्या अंगाला मान चोळे आणि तासन् तास पुढ्यातल्या कोवळ्या गवताला तोंड न लावता तसेच उभे राही.

एका दुपारी राजम्मा बाबांकडे आली. गळ्यातली बोरमाळ त्यांच्यापुढे ठेवून म्हणाली, "कुणाकडून तरी यावर दोनशे रुपये मिळतात काय बघा. काय व्याज होईल ते पुढं देता येईल. चोख तीन तोळ्यांचा ऐवज आहे हा."

बाबा अवघडले. पाच-पन्नास रुपयांची अडचण असती तर मी स्वतःच काहीतरी जोडणी करून दिली असती, असे ते म्हणाले आणि दुसऱ्या दिवशी तो जिन्नस घेऊन पोतदाराच्या दुकानाला गेले.

राजम्माचा गळा आता एकदम मोकळा दिसत होता. मखर उतरविलेल्या गौरीसारखा!

* *

तिच्या नवऱ्याला कसलाच गुण येत नव्हता. त्याचे शरीर दुबळे झाले होते तसे मनही. क्षणाक्षणाला तो चिडायचा, संतापायचा, न ऐकाव्यात अशा शिव्या राजम्माला द्यायचा. त्या ऐकून ती जखमी पोपटाप्रमाणे तडफडे आणि ओठ घट्ट मिटून त्याची उस्तवार करी. चार लोक चार व्रते सांगत. ती सगळी राजम्मा पाळी. रात्रभर जळती चिमणी समोर ठेवून नवऱ्याच्या बाजल्याशेजारी बसे.

कधी कधी बाबा म्हणत, "आता काही तो जास्त दिवस टिकेल असं वाटत नाही. जोशीच म्हणाले तसं. फारच खंगून गेलाय. नुसता सापळा उरलाय हाडांचा!"

राजम्माच्या घरात जायचे भय वाटे. ती केव्हा मुद्दाम बोलावी. हे घेऊन ये, ते आणून दे म्हणून सांगे. तिचे अवघे घरच आजारी वाटे. तिथे थांबले की श्वास गुदमरे. तिच्या नवऱ्याच्या धापा ऐकू येत.

राजम्माच्या वाढलेल्या बांगड्यांचे तुकडे मी खूप साठविले होते. ते हिरवे-तांबडे तुकडे चिमणीच्या ज्योतीवर धरून, वाकवून त्यांच्या पाकळ्या तयार केल्या होत्या. त्या एकमेकींत गुंफवून त्यांची लांबच्या लांब माळ झाली होती. कोनाड्यातल्या रामाच्या मूर्तीवर ती माळ ठेवली होती. खिडकीतून वाऱ्याची झुळूक आली की, पाकळ्या थरथरत. मंद किणकिणत. राजम्माच आली की काय असे वाटे.

...अजून उजाडले नव्हते. आम्ही झोपेत होतो; आणि काळोख चिरत राजम्माचा आक्रोश घुमला. चादरी टाकून आम्ही लगबगीने उठलो. बाहेर आलो. बाबा लगेच पलीकडे गेले आणि आपली सख्खी बहीण गतधवा व्हावी, तशा दुःखाने आई मटकन् खाली बसली.

* *

तीन-चार महिन्यांनी, गोकाकच्या एका मठाच्या पुजाऱ्याशी राजम्माचे दुसरे लग्न ठरले. ती तिकडे गेली.

आठवण म्हणून जाताना तिने मला पितळी ताटवाटी दिली. आईला जरीचा काठ असलेले सुंदर खण. उरलेले ठळक ठळक सामान तिने बरोबर घेतले. घोडे दीडशेला विकून टाकले. भटजींना गाय बाळगायला देऊन टाकली आणि येईल त्या किमतीला घर फुंकून टाकले.

आईला ती म्हणाली, "जाते मी इथून. ओळख ठेवा माझी. इथं इतके दिवस कसेबसे काढले. आले ते भोग भोगले. बाईमाणूस मी एकटी! पोटी पोर असतं तर त्याच्यासाठी इथंच राहिले असते. देवानं तेही दिलं नाही. कुणाचा तरी आधार हवा... तुमचे फार उपकार आहेत माझ्यावर. माया आटू देऊ नका माझ्यावरची." आणि ती आईच्या पाया पडू लागली.

आईला गहिवरून आले.

पुढे कित्येक दिवस राजम्माच्या आठवणी आई काढी. तिच्या नशिबाबद्दल हळहळे. आता तिचे कसे चालले असेल म्हणून काळजी करी.

राजम्माचे ते घर सोनाराने विकत घेतले होते. पुष्कळ दिवस तिथे कोणी राहायलाच आले नाही. वाऱ्यापावसाने ते ढासळायला लागले. आजूबाजूच्या लोकांनी कौले, विटा, दारा–खिडक्यांच्या चौकटी पळवून नेल्या. कुजलेल्या वाशांचे छप्पर खाली कलले. उंदीर–घुशींनी तिथे राहायला सुरुवात केली.

एका संध्याकाळी, त्या घराजवळून येताना अचानक कानांवर काकणांची किणकिण आली. राजम्माच्या बांगड्यांची किणकिण! क्षणभर अंग शहारले. राजम्मा डोळ्यांपुढे उभी राहिली. मनात तिच्या आठवणींचे मोहोळ जागे झाले. त्या घराभोवती पाकोळ्यांनी फेर धरला होता.

पाच–सहा वर्षांनी राजम्माबद्दल कळले ते एवढेच : तिने विहिरीत उडी टाकून जीव दिला. गाव मात्र बोलत होता म्हणे – नवऱ्यानेच तिला विहिरीत ढकलली. का, कशाबद्दल – काहीच कळले नाही.

राजम्माला मग आम्ही जवळ जवळ पूर्ण विसरून गेलो.

◻ ◻ ◻


# इझिडेन्ट

लहान मुलांना दांत सुलभ रीतीने येण्यास मदत करते.

ताप, जुलाब, सर्दी वगैरे कोणताही त्रास होत नाही.

प्रतिबंधक म्हणून चौथ्या महिन्यातच सुरू करा.

उत्पादक :

**न्यू इरा होमिओपॅथिक फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर (पश्चिम) मुंबई – २८.


एजन्सी नसलेल्या गावी एजन्टस् नेमणे आहेत.

# सिकता

## चंद्रशेखर ६

संध्याकाळी पाचचा सुमार. स्टेट्समनची अँबॅसिडर डमडम एअरपोर्टवरून कलकत्त्याच्या रोखाने निघाली आहे. गाडीत मागे मी व रॉय, पुढे स्टेट्समनचा डमडम कॉरस्पॉण्डण्ट चंद्रशेखर. तिघांच्याही हातांत सिगारेटी जळत आहेत. दूरवर विमानतळाचे रंगीन दृश्य लहान लहान होत आहे. अजस्र विमाने जमिनीला नाके लावून बेंगरूळपणे उभी आहेत. रॉय मला बंगला काँग्रेसचे श्री. सुकुमार रॉय यांची माहिती सांगतो आहे.

रॉयच्या म्हणण्याप्रमाणे सुकुमार हे आघाडी सरकारचे ब्रेनमन ! कोटचा करण्यात रममाण होणाऱ्या माझ्या मनात लगेच शब्द येतो, ब्रेनगन. त्यावरून आठवण होते नक्षलवादाची. रॉय थांबला त्याचा फायदा घेत मी चंद्रशेखरला विचारतो,



"यार, मला उद्याच्या सकाळच्या दार्जिलिंग फ्लाईटला जागा मिळवून देता?"

चंद्रशेखर मागे वळून बघतो. तो काही बोलण्याच्या आत रॉयच पुन्हा बोलू लागतो–

"वा, वा, चंद्रशेखर! तू जरूर दार्जिलिंगला जा. अॅलीस हॉटेलात जा. माझे नाव सांग. तुझी मस्त व्यवस्था होईल. मी आमच्या दार्जिलिंग वार्ताहराला टेलिफोन करून ठेवतोच."

रॉयचे हे आदरातिथ्य कसे आवरावे हे मला कळत नाही. मी त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत चंद्रशेखरला सांगतो–

"दार्जिलिंग बघण्यात मला काडीचाही रस नाही. येथे कलकत्त्यात मला नक्षलवाद्यांना भेटणे प्रशस्त वाटत नाही. दार्जिलिंगला मी तो प्रयत्न करीन. पण साली फ्लाईटला जागाच नाही."

यावर चंद्रशेखर एक ओळखीचे हास्य करतो आणि 'भोः वत्सा!' असा चेहरा करून खास वार्ताहरी ढंगात सांगतो–

"त्यासाठी दार्जिलिंगला जाण्याची गरज नाही, महाशय. येथे तुम्ही कोणालाही भेटू शकता."

"पण– नक्षलवाद्यांचा पत्ता कसा काय मिळणार? इथे कलकत्त्यात किती नक्षलवादी मिळणार?"

जाणतेपणाची आणखी एक उबळ प्रयासाने आवरीत ड्रायव्हरला गाडी थांबवण्यास चंद्रशेखर सांगतो. उत्तर कलकत्त्यातील कोठली तरी भयाण गल्ली! तो खाडकन दार उघडतो आणि खाली उतरतो.

"हे बघ! ९६ टक्के नक्षलवादी आज कलकत्त्यात आहेत. या गल्लीतल्या वस्तीत कोठेही जा, तुझे काम होईल. पण मला वाटतं, तू आमच्या प्रशांतो सरकारला भेट. तो तुला मदत करील. अच्छा– रॉय साब, अच्छा."

"मजा आहे लेका तुझी." रॉय वैतागून चंद्रशेखरला म्हणतो. "मला सिटी एडिशनचा फोटो मिळाला नाही अजून. त्याच्यापुढे प्रोसेसिंग!" वैताग असह्य झाल्याने रॉय एक सिगारेट पेटवतो.

माझे आश्चर्य वाढतच जाते. ग्रामीण सशस्त्र क्रांतीचे ध्येय ठेवून अस्तित्वात आलेला नक्षलवाद आणि त्याचे बहुसंख्य अनुयायी कलकत्त्यात कसे?

हरीष मुकर्जी रोड– लॉरेटाचे घर. एका कोचावर लॉरेटा बसली आहे– दुसऱ्या कोचावर लिलिया– माझ्या खुर्चीशेजारी. कोका कोलाचा ग्लास आहे– हातांत सिगारेट!

कसे कोण जाणे, आम्ही नक्षलवादावर बोलू लागलो आहोत. कलकत्ता युनिव्हर्सिटीतील शेकडो मुले-मुली नक्षलवादी आहेत हे मला लॉरेटाकडून समजते. एका नक्षलवादी तरुणीचे नावही लॉरेटा सांगते.

" तिला भेटण्याचं कसं काय ?"

" आय ॲम सॉरी– मला तिचं नाव केवळ ऐकून माहिती आहे. " लॉरेटा.

" तुला अजिताचं नाव ठाऊक आहे ? "

" कोण अजिता ?"

" वायनाडची राणी. अजिता नारायण. वय वर्षे अठरा. कमरेला दोन पिस्तुले लटकावून भटकणारं एक अफलातून अवखळपण !"

मी बेभानपणे बोलत राहतो. पाच मिनिटांनी लॉरेटा कट शॉर्ट करते.

" तुम्ही नक्षलवादी आहात काय ?"

" मी ? आणि नक्षलवादी ? " मी हसण्याचा प्रयत्न करतो आणि म्हणतो " लॉरेटा, मी ' छळवादी ' आहे."

लॉरेटा गमतीदारपणे हसते. लिलियाकडे एक खाजगी कटाक्ष रवाना होतो. मी सिगारेट पेटवण्याचा एस्केप शोधतो. नक्षलवाद हा कसा मूर्खपणा आहे हे मी नंतर अस्खलितपणे लॉरेटा–लिलिया या जोडीला पटवून देतो. (– तशी खास जरुरी नसताना ! )

" मग तुम्ही या प्रवृत्तीशी सामना का देत नाही ?" आदल्या दिवशी मी असे बोलून गेलो आहे, की कोठेही कोणचाही प्रश्न दिसला की तेथे मी नकळत आकर्षिला जातो. त्याचा संदर्भ लॉरेटा असा देत आहे.

" लॉरेटा ! तुझा रोख मला कळला. सामना देण्याचा आमचा बाणा नसून मना करण्याचा आहे. यातूनच नक्षलवाद पुष्ट होत आहे. "

चर्चा सोयीस्करपणे दुसऱ्या विषयाकडे झुकते.

—एका महाराष्ट्रीय फॅक्टरीचे मॅनेजर माझ्यासमोर बसले आहेत; त्यांच्या फॅक्टरीत मला घेऊन जावे की नाही याचा स्वतःशी विचार करीत. मी डिरेक्टरी चाळता चाळता एकदम त्यांना विचारतो,

" का हो ! इथं तीन के. संन्याल आहेत. यांपैकी कानूचा नंबर कोणचा असेल ? काही कल्पना ?"

मॅनेजर खुर्चीतून एक फूट वर उडतात आणि तट्कन उभेच राहतात.

" कानू कोण ?"

" अहो, आपला नक्षलवादी लीडर. " उभा जन्म आम्ही दोघांनीही नक्षलवादी चळवळीत काढला आहे, अशा सलगीने मी सांगतो.

मॅनेजर कपाळावरचा घाम पुसतात. मला फॅक्टरीत न्यावयाचे नाही हा त्यांचा निर्णय मला अदबीने सांगतात आणि टेलिफोन फिरवून त्यांच्या एका नाटकवेड्या दोस्ताशी (बहुतेक ! ) ' काळे बेट लाल बत्ती ' नाटकासंबंधी दिलखुलास चर्चा करू लागतात. एकदा तर टेलिफोनवरून टाळीही देतात–घेतात ! कलकत्ता मिशनसाठी मी स्वीकारलेला लोचट आविर्भाव कितीही कडवा असला तरी या ठिकाणी ' लाल

बत्ती' लागली आहे हे मला कळून चुकते. मी उठतो.

—हरेकृष्ण कोनारांचे चेंबर. थाट सगळा 'समीर' लेखातील वर्णनाप्रमाणेच! 'नक्षलवादी' नाव काढल्याबरोबर कोनारबाबू असे चवताळतात, की काही विचारू नका. नक्षलवाद्यांची थिअरी वगैरे काय असे विचारण्याचे धाडस मी तरीही करतोच.

या चक्रम माणसाला काय उत्तर द्यावे याच कोनारबाबू विचार करीत असताना ज्यांनी ही भेट घडवून आणली ते प्रमोद चक्रवर्ती मला खूण करतात.

- नक्षलवादाची थिअरी न ऐकताच मी कोनारबाबूंचा निरोप घेतो आणि प्रतिभा मुकर्जींच्या चेंबरमध्ये जातो. ग्रामीण शेतकरी चळवळींचा प्रतिभाताईंचा अनुभव दांडगा. मी माझा खास प्रश्न विचारतो—

"ताई, तुम्ही आज बारा वर्षं इथं किसानांचे लढे लढवीत आहात. आता त्यांचं वकीलपत्र कानूबाबूंनी घेतलं आहे. अखेरीस कोणता मार्ग प्रीव्हेल होणार?"

प्रतिभाताई थोड्या अडचणीत सापडतात. "याबाबत आमच्या पार्टीची भूमिका तुम्हांला सुबोधबाबूंकडून कळेल."

"मी सुबोधशी बोललो आहे," शांतपणे मी सांगतो. घेणेकऱ्यासारखा बसून राहतो.

"हे पाहा चंद्रशेखर, नक्षलवाद्यांपेक्षा आमची पार्टी खूप रॅडिकल आहे. पण आम्हांला घिसाडघाई करावयाची नाही. प्रत्येक ग्रामीण बेसमध्ये अगोदर सिद्धान्तांची मशागत केली पाहिजे. मग क्रांती वगैरे सर्व."

मी पाहतच राहतो. नक्षलवाद्यांपेक्षा आम्ही रॅडिकल आहोत, असे राज्य-सरकारची एक मंत्रीण मला सहजपणे सांगत आहे. मला राहवत नाही.

"तुम्ही शेतकऱ्यांना जमिनी वाटीत आहात. तुम्ही कसल्या रॅडिकल? तुम्ही तर खाजगी मालकीची केंद्रे व विस्तार वाढवीत आहात. ही प्रिपरेटरी प्रोप्रायटरशिप कशासाठी?"

प्रतिभाजी जरा अस्वस्थ होतात. "व्हॉट आर यू टॉकिंग? या जमिनी नफा मिळविण्यासाठी नाहीत तर निर्वाहासाठी आहेत." प्रतिभा मुकर्जी.

"सो व्हॉट? निर्वाहासाठी असल्या तरी मालकी ती मालकीच! आणि प्रत्येक आर्थिक व्यवहार निर्वाहाच्या पातळीवर गेल्यावर चांगला ठरणार असेल तर लवकरच आपण सबसिस्टन्स इकॉनॉमीत शिरू व श्रमविभाजन वगैरे सारे नष्ट होईल. होय ना?"

आता प्रतिभाजी जवळजवळ मला हाकलून देण्याच्या मूडमध्ये आहेत; पण त्याऐवजी त्या चहा सांगतात. मी पुढे बोलतो. मघाची माझी फ्रेझ रिव्हाईज करून मी म्हणतो, "तुम्ही प्रिमिटिव्ह प्रोप्रायटरशिप निर्माण करीत आहात व तिचे उदात्तीकरण करीत आहात."

" यू आर फाँड ऑफ वर्ड्स् अँड यू हॅव ए वे विथ वर्ड–" प्रतिभाजी असह्याय्यपणे म्हणतात.

" खरं आहे – पण तुम्हा साम्यवाद्यांबद्दलही मी हेच म्हणू शकतो. व्हॉट डु यू थिंक ? "

"तुमची आयडिऑलॉजी काय ?" सुरुवातीस विचारलेला प्रश्न प्रतिभाजी पुन्हा विचारतात.

" मी पत्रकार. मला कसली आयडिऑलॉजी ? मी इंटलेक्चुअल वेवर्ड आहे."

" ते दिसतंच आहे." प्रतिभाजी.

" बरं मग नक्षलवादाचं काय ?" मी मुद्दा सोडीत नाही.

" बंगालच्या राजकीय जीवनातून नक्षलवाद आपोआप नष्ट होईल. वेट अँड वॉच."

" तथास्तु !" म्हणून मी ताईंचा निरोप घेतो.

बिधन-सरनी रोड. दुपारी चारचा सुमार. मी असीमची वाट पाहतो आहे. रस्त्यावरच उभा आहे. आत फार उकडते ! एक पन्नासजणांची मिरवणूक येते. पंधरावीस वर्षांची मुले. खांद्यावर लाल झेंडे. घोषणा ही – ' नक्षलवादी जुग जुग जीओ, नक्षलवादी जुग जुग जीओ. '

मी बरोबर ऐकले ना याची मला शंका येते. भर दुपारी कलकत्त्याच्या हमरस्त्यावर चीनवादी पार्टीची मिरवणूक ! मी नजीकच्या बुकडेपोत जातो.

" मला बंगाली इन्टु इंग्रजी डिक्शनरी मिळेल का ?" मी विचारतो. दुकानातला बंगाली रिप व्हॅन विंकल जागा होण्यास थोडा वेळ लागतो. दोन-तीन डिक्शनऱ्या पाहता पाहता मी दुकानातील एका बंगाली माणसास विचारतो – " ही मुले काय ओरडत होती ?"

" नक्षलवादी जुग जुग जीओ !" तो अॅब्सेंट माइंडेडली सांगतो. मी थोडा खोलात शिरताच तो गप्प होतो.

कलकत्त्याच्या सर्व मुक्कामात नक्षलवादाचा पिच्छा मी सोडीत नाही आणि माझा पिच्छा ह्या बेटा नक्षलवाद सोडीत नाही. भेटेल त्याला हा प्रश्न : नक्षलवादाचे काय ?

या प्रश्नाचे उत्तर मला समोरच्या माणसाकडून केव्हाच मिळाले नाही. म्हणजे शब्दाच्या माध्यमात मी त्याच्या चेहऱ्यावर शोधतो. भीती, उबग, तुच्छता, शत्रुत्व, आश्चर्य, मूढपणा असे अनेक भाव अनेकांच्या चेहऱ्यावर उमटतात. मी ते पाहतो.

कलकत्ता शहरावर नक्षलवादाची दाट छाया दिसते. रोज एक-दोन नक्षलवादी मिरवणुका, सभा, मोर्चे-पत्रके वगैरे सारे साग्रसंगीत चालू आहे.

या चकव्याचा शेवट लावावा म्हणून मी केशवचंद्र स्ट्रीटवरील सी. पी. (एम. एल.) पार्टीच्या ऑफिसातही जाऊन आलो. पण मला कोणी बडा नक्षलवादी भेटला नाही.



चौरंगी चौकातील नित्याचे दृश्य...

हो चळवळ कायमचीच चीनकडे डोळे लावून बसणार काय ?

मग मी रोज बुकस्टॉलवर नक्षलवादी वाङ्‌मय शोधू लागलो. 'लिबरेशन'चा मे अंक, फ्रॉंटियर कॉल वगैरे प्रकाशने व अनेक पत्रके यांच्या साहाय्याने नक्षलवादाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो. यापुढील सर्व मजकूर या प्रयत्नांतून निर्माण झालेला समजावा, कलकत्त्यातील कोणाही व्यक्तीचा या विवेचनाशी काही संबंध नाही, हा खुलासा मुद्दाम करतो.

नक्षलवादी पक्ष (सी. पी. एम्. एल.) एक मे १९६९ रोजी स्थापन झाला. त्यापूर्वी दोन वर्षे नक्षलवादी चळवळ अस्तित्वात होती. बंगालमध्ये नक्षलवादी, आंध्रमध्ये श्रीकाकुलम, केरळमध्ये वायनाड हे त्यांचे स्ट्रॉंग होल्डस वा बेसेस. कलकत्त्यात सुमारे २५ हजार कडवे नक्षलवादी आहेत. बहुतेक सुशिक्षित. बरेच कॉलेज विद्यार्थी, कलावंत, व्यावसायिक, साहित्यिक, डॉक्टर्स, अनेकांची नावे नक्षलवादी म्हणून सर्रास घेतली जातात. पैकी सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण नाव म्हणजे प्रख्यात अभिनेते श्री. उत्पल दत्त ('गुरू' फेम) यांचे !

हे नागरी नक्षलवादी केवळ पक्षाला शोभा येण्यासाठी. यांपैकी कित्येकांना शेतकरी–शेत वगैरे गोष्टी केवळ सिनेमात माहिती. चित्तरंजन रोड, रासबिहारी अव्हेन्यू, एस्प्लनेड वगैरे ठिकाणच्या पॉश कॉफी हाऊसमध्ये बसून नक्षलवादावर

घनघोर चर्चा करीत बसलेले अनेक बंगाली दिसतात. सरकारी नोकरांतही कलकत्यापुरते बोलायचे तर ही चळवळ 'ऑर्डर ऑफ् द् डे' आहे. या प्रेरणेचे आकर्षण जीवघेणे दिसून येते.

एवढे झाले नक्षलवादाच्या प्रभावाविषयी! आता नेतृत्व. चारू मुजुमदार, कानू संन्याल, निमाई घोष, समर सेन वगैरे बंगाली बाबू या चळवळीचे नेते. कानू स्वतः जोतेदार! (कोनारही जोतेदारच!) चारूबाबू नक्षलवादाचे मार्क्स म्हटले तर कानू हा लेनिन म्हणावा लागेल. टक्कलवाला, पँट–मॅनिला घालणारा, एखाद्या हेड क्लार्कसारखा दिसणारा कानू काय चीज आहे हे कळण्यासाठी त्याच्या 'मे रॅली' भाषणातील निवडक वाक्ये खाली देत आहे–

–" 'जेव्हा लोक मला दाद देतात तेव्हा त्रिबेनी कानू, शोभन अली, अप्पलस्वामी नायडू, रेंगिम आणि बाबूलाल बिश्वकर्मकार या नक्षल हुतात्मा वीरांचे चेहरे माझ्या नजरेसमोर उभे राहतात व मी किती क्षुद्र आहे याची मला जाणीव होते.

—'साम्राज्यवाद व पुर्नविचारवाद यांना जगात आज उभे राहायला जागा नाही. भारत म्हणजे त्यांना आपले कुरण वाटत होते. पण येथेही माओचे लाल निशाण विजयीपणाने फडकू लागले आहे.

—'क्रांतिकारी पक्ष असल्याशिवाय क्रांतीची प्रगती होणार नाही, हे आपले थोर शिक्षक माओ यांनी सांगून ठेवले आहे.

—'तराई भागात आम्ही जेव्हा माओची थोर शिकवण–' लढाई ही लढाईतून शिका'– ही अमलात आणण्यासाठी गेलो तेव्हा तेथील किसानांनी आमचे व आमच्या विचारांचे स्वागत केले आणि अशा प्रकारे नक्षलबाडीचा जन्म झाला. जो भारताचा चिंगकँग पर्वत ठरली.

—'मोठ्या अभिमानाने व असीम आनंदाने मी असे जाहीर करतो की, आपण खऱ्याखुऱ्या साम्यवादी पक्षाची स्थापना आज केली आहे. प्रचंड व प्रदीर्घ घोषणा 'सी. पी. एम. एल. झिंदाबाद'–' क्रांती चिरायू होवो.'

—'जगातील सर्व जनतेला कटू त्याग व रक्तपात यांमधून चेअरमन माओचा थोर सिद्धांत पटला आहे. 'राजकीय सभेची वाढ बंदुकीच्या नळीतून होत असते' हाच तो सिद्धांत.

—'मी खूप बोललो व त्यात काही चुकाही असतील. हे शक्य आहे व नैसर्गिकही आहे; कारण चेअरमन माओचे विचार मी अद्याप पूर्णपणे आत्मसात करू शकलो नाही. माझी अशी खात्री आहे की, माझ्या चुकांवर टीका करून तुम्ही मला त्या सुधारण्यास मदत कराल."

या सभेत झालेल्या दोन घोषणा अशा–

'लाँग लिव्ह द् ग्रेट कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायना.'

'लाँग लिव्ह द् चेअरमन माओ–द ग्रेट लीडर ऑफ द् वर्ल्डस पीपल.

वरील मजकुरात सी. पी. एम. एल. पार्टीच्या ठरावातील एका मुद्याची भर घातली की, नक्षलवादी तत्त्वज्ञान (!) पुरे होते.

'समाजवादी चीन व शेजारी पाकिस्तान यांच्याविरुद्ध राष्ट्रवादी संकुचितपणा पेटविला जात असून त्यामागे लोकांना फसविणे व त्यांचा लढा दाबून टाकणे हा उद्देश आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या नावाखाली अन्य राष्ट्रीयत्वाचा (नॅशनॅलिटीज्) विरोध असूनदेखील हिंदी लादण्याचा सत्ताधारी प्रयत्न करीत आहेत. सर्व (भारतांतर्गत) राष्ट्रांची व राष्ट्रभाषांची समानता नाकारली जात आहे.'

नक्षलवादाचे स्वरूप थोडक्यात असे आहे. भारत आज अमेरिका व रशिया यांच्या पूर्ण वर्चस्वाखाली गेला आहे. भांडवलदार–दलाल यांच्या कृष्णकारस्थानामुळे सर्वसाधारण भारतीय भरडला जात आहे. आपली सत्ता टिकविण्यासाठी भांडवलदार–दलाल आपल्या राजकीय पित्त्यांकरवी राष्ट्रवादाचे ढोंग माजवीत आहेत. विषमता व दारिद्र्य यांचा कडेलोट झाला आहे.

—हे सर्व नामशेष करून क्रांतिकारी समाजाची स्थापना करण्यासाठी माओचे तत्त्वज्ञान अमलात आणले पाहिजे. दुसरा उपाय नाही–

माओचे तत्त्वज्ञान म्हणजे सशस्त्र लढा, ग्रामीण भागांचा शहरी भागांस वेढा व लढ्यातून लढ्याचे शिक्षण हे होय. माओवाद अर्थातच एवढ्यापुरता मर्यादित नाही. पण येथे नक्षलवादाची तात्त्विक छाननी करण्याचा इरादा नसल्याने जास्त खोलात जाण्याचे कारण नाही!

तरीसुद्धा माओवादाची एक सैद्धान्तिक मर्यादा येथे नमूद केली पाहिजे. माओवाद हा मार्गस्वरूप आहे. त्यामध्ये मार्गाव्यतिरिक्त निराळे ध्येय असे नाही. सशस्त्र क्रांती हाच मार्ग आणि तेच ध्येय! हे समजून घेतल्याखेरीज नक्षलवादाची संगती लागणार नाही.

कानू संन्यालच्या तेरा पानी भाषणामध्ये कोठेही आर्थिक रचनेचा खास उल्लेख नाही. प्रत्येक मुद्यावर कानू माओचा हवाला देतो. पिळवणूक व जुलूम यांपासून सुटका हे अंतिम ध्येय म्हणून नमूद केले असले तरी त्याचे तपशीलवार वर्णन कोठेही नाही. कदाचित यापुढे ते देण्यात येईल.

नक्षलवादी चळवळीच्या संदर्भात तीन प्रश्न उपस्थित होतात ते असे :–

१. ही चळवळ कायम चीनकडे डोळे लावून बसणार काय?

२. सशस्त्र क्रांतीचा मार्ग सातत्याने अमलात आणता येईल काय?

३. सशस्त्र क्रांतीबरोबर 'जिंकलेले प्रदेश' (काही जिंकल्यास) कोणत्या तत्त्वावर पुनर्रचित होणार?

एकेका मुद्याचे थोडक्यात स्पष्टीकरण करू :–

पहिल्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असेच आहे. कारण या प्रकाराला भारतीय साम्यवादी पक्षाच्या इतिहासात दाखला आहे. आजवर भारतीय साम्यवादाचे तोंड

मॉस्कोकडे होते. देशाच्या बाहेर निष्ठा ठेवणे हे साम्यवाद्यांना नवीन नाही. त्यांची ती मनोभूमिकाच आहे. त्यामुळे यापुढे चीनकडे नेतृत्वासाठी बघणे सुरू झाले तर ते अस्वाभाविक नाही.

दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे आहे. सशस्त्र क्रांती वगैरे कल्पना या भूमीत रुजणाऱ्या नव्हत. चार–दोन फडतुस बंदुका व गावठी बाँब यांच्या साह्याने प्रतीकात्मक चळवळ करणे निराळे आणि प्रत्यक्ष युद्धभूमिकेवर एकेक प्रदेश ताब्यात घेणे निराळे. बंगाल काय किंवा अन्य भारत काय, सशस्त्र क्रांतीचे लोकांना वावडे आहे. ब्रिटिशांसारख्या पूर्णपणे परकी सत्तेविरुद्धदेखील येथे सशस्त्र लढ्याला फारसे अनुयायी मिळू शकले नाहीत, हा इतिहासाचा दाखला आहे.

तिसऱ्या मुद्याचा निकाल दुसऱ्या मुद्यातच लागला आहे. प्रदेश शस्त्रबळाने जिंकणे ही कल्पना आता अणुयुगात हास्यास्पदच आहे. ध्येयवादात्मकदृष्टचा जिंकलेले प्रदेश, काही प्रत्यक्ष कार्यक्रम नसल्याने पुन्हा बिगर–नक्षलवादी होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी परंपरेत वाढलेल्या सर्वसाधारण भारतीयास व विशेषतः महाराष्ट्रीयास परकी देशाकडे एवढी निष्ठा ठेवणारे लोक भारतात असतील याचा अचंबा वाटणे साहजिकच आहे; परंतु असे लोक आहेत हे खरे ! अमेरिकावादी वा रशियावादी भारतीय प्रेरणा आपणांस इतक्या भयावह वाटत नाहीत व चीनवादी प्रेरणा वाटतात, याचे कारण चीनने आपल्यावर केलेला हल्ला हे होय. राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान एवढे उदात्त असताना त्याचा प्रभाव का पडत नाही, ही आज प्रत्येक भारतीयाला अस्वस्थ करणारी गोष्ट आहे. या लेखमालेच्या कक्षेत हा विषय येत नसला तरी प. बंगालमधील प्रेरणा व प्रश्न यांच्या संदर्भात या कोडयाचा थोडा उलगडा होतो का हे पाहणे उपयुक्त ठरेल असे वाटते.

राष्ट्रवाद उदात्त ठरला याचे कारण त्याने एका वेळी त्या वेळच्या प्रबळ हितसंबंधांचे रक्षण केले. एकेका देशाच्या सीमेत मर्यादित असलेले उद्योग–व्यापार यांचे साम्राज्य त्याने अधिक बळकट केले. जागतिक समानतेच्या कूट प्रश्नातून एकेका

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

देशास सोडवून आपल्यापुरती समृद्धी आणण्याचा मार्ग सोपा करण्याचे काम राष्ट्रवादाने केले.

जगातील प्रमुख देश पहिल्या महायुद्धापर्यंत या मनोभूमिकेत राहिले. त्यानंतर बाजारपेठांची देशापुरती मर्यादित व्याप्ती अपुरी वाटू लागली. भांडवल गुंतवणुकीसही देशाचे क्षेत्र अपुरे पडू लागले. आर्थिक व्यवहाराच्या या गरजांपायी पूर्वीचा अतिरिक्त राष्ट्रवाद (संरक्षणवाद, व्यापारवाद, भूमिवाद) मागे पडून राष्ट्रवादाला आर्थिक क्षेत्रापुरते दुय्यम स्थान प्राप्त झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर तर ते अजिबात नष्ट झाले.

राष्ट्रवादाची ही वाटचाल लक्षात घेतली तर एक शतक आधी मार्क्सने भांडवलदारी अर्थव्यवस्थेची भावी कोंडी ओळखली होती याची कल्पना येते. भांडवलदारी उत्पादन पद्धतीमध्ये एक असा विशेष आहे, की ज्यामुळे सतत मोठ्या बाजारपेठेच्या व गुंतवणूक क्षेत्राच्या शोधात राहावे लागते. आंतरराष्ट्रीयवाद हे आर्थिक व्यवहारांचे नैसर्गिक स्वरूप आहे. 'जगातील कामगारांनो एक व्हा' असा संदेश मार्क्सने दिला हा केवळ मनोभूमिकात्मक अपघात होय. थोडी निराळी पार्श्वभूमी असती तर मार्क्सने असा संदेश दिला असता की, 'जगातील उत्पादकांनो एक व्हा !'

हाच नेमका संदेश सुमारें पाऊण शतकानंतर भांडवलशाहीचा तारणहार लॉर्ड केन्स याने दिला व तो सर्व राष्ट्रवादी देशांनी शिरोधार्य मानला. साम्यवादी तत्त्वज्ञानाने आर्थिक व्यवहारांचे आंतरराष्ट्रीयत्व एक शतक आधी ओळखले हे श्रेय इतिहासाला निश्चित मान्य करावे लागेल.

साम्यवादाची शोकांतिका ही, की त्याच्या साऱ्या तत्त्वज्ञानात व भूमिकेत प्रथमपासून अखेरपर्यंत मूळ उत्पादन चौकट भांडवलशाही नमुन्याचीच गृहीत धरली आहे. शोकांतिका अशा अर्थाने की, श्रमविभाजन व विशेषीकरण यांवर आधारित आणि चलनाधिष्ठित अशी अर्थव्यवस्था दुसरे कोणतेच रूप धारण करू शकत नाही. पुढील साम्यवादाने हे ओळखून भांडवशाही चौकटीवरच आपले लेबल मारले व त्याला नाव दिले, समाजवाद वा सरकारी भांडवलशाही !

आंतरराष्ट्रीयत्व हा आर्थिक व्यवहाराचा गाभा असल्याने व मानवी जीवन मूलतः अर्थाधिष्ठित असल्याने या व्यवहारांच्या गरजांप्रमाणे राजकीय तत्त्वज्ञाने आलटून पालटून राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय होत गेली. हे अपरिहार्य आहे. साम्यवादाच्या आंतरराष्ट्रीयत्वाला बिचकणाऱ्या राष्ट्रवाद्यांना भांडवलशाहीतील तितकीच व्यापक आंतरराष्ट्रीयता खटकत नाही हे मनाच्या आंधळेपणाचे ऐतिहासिक उदाहरण होय !

पुढचा प्रश्न एखाद्या देशाकडे नेतृत्वासाठी पाहावे किंवा नाही हा आहे. भांडवलशाहीच्या चढत्या काळात ब्रिटन हे जागतिक नेते राष्ट्र होते. साम्यवादाच्या प्रयोग-

काळात रशिया हे सर्व 'जगा'चे (अमेरिका धरून) वैचारिक नेते-राष्ट्र होते. आता मानवी प्रयत्नांनी आणखी एक टप्पा गाठला आहे. भांडवलशाही व साम्यवाद यांचे समान सत्यस्वरूप ओळखण्याचा प्रयत्न हा तो टप्पा होय. ग्रेट सिंथिसिसचे हे युग आहे. या ग्रेट सिंथिसिसचे आज प्रतिनिधित्व करणारे एकमेव राष्ट्र म्हणजे चीन हे होय. चीनने आपणांवर हल्ला केला म्हणून हे ऐतिहासिक सत्य बदलत नाही. युरोपात कित्येक देश कित्येकदा एकमेकांविरुद्ध लढले पण युरोपीय तत्त्वज्ञानाच्या वाटचालीत त्यामुळे खंड पडला नाही.

तेव्हा हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की तात्त्विक नेतृत्वासाठी चीनकडे पाहणे हा देशद्रोह नव्हे.

नक्षलवादाचे मरण दुसऱ्याच एका ठिकाणी आहे आणि तेच माओवादाचेही मरण आहे.

'सत्तेचा उगम बंदुकीच्या नळीतून होतो' हा विचार भ्रामक आहे! माओ-त्से-तुंगसारखा नेता जेव्हा हा विचार मांडतो तेव्हा त्याला काही मर्यादित विशिष्ट अर्थ असतो. तो सांगण्यापूर्वी या वाक्याचा सरधोपट अर्थ घेतला तर काय अनवस्था प्रसंग (वैचारिक दृष्टचा) ओढवतो हे सांगणे बरे!

बंदुका या प्रत्येक देशात सरकारच्याजवळ असतात. कोणत्याही स्वातंत्र्यवादी वा क्रांतिकारी चळवळीजवळ सरकारएवढचा बंदुका असणे शक्य नाही. असे इतिहासात कधी घडलेले नाही. असे असतानाही फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली, अमेरिकेत राज्य-क्रांती झाली, रशियामध्ये लाल क्रांती झाली, भारतात ब्रिटिशांचे उच्चाटन झाले, खुद्द चीनमध्ये क्रांती झाली. याचा अर्थ असा की, सत्तेचा उगम बंदुकीच्या नळीतून होत नसतो. जर सर्वशस्त्रसंपन्न सरकारचा पराभव नक्षलवादी करू शकले तर ते त्यांचाच सिद्धांत खोटा पाडतील; कारण मोठचा शस्त्रबळावर त्यांनी मात करून दाखवली असेल.

पण हा सिद्धांत मुळात खोटाच आहे. क्रांती शब्दांनी होत असते, शस्त्रांनी नव्हे!

याचा पडताळा मी दुसऱ्या कोठल्या उदाहरणाने न देता खुद्द माओच्या उदा-हरणानेच देऊ शकतो, याचा मला अत्यानंद होत आहे.

'बंदुकीच्या नळीतून सत्तेचा उगम होत असतो,' या माओच्या शब्दांनी जग-भरच्या अनेक निरनिराळचा देशांत क्रांतीची ज्योत पेटू शकते. माओने प्रत्येक देशात लाखो बंदुका पाठवल्या तरी हे शक्य होणार नाही! या वाक्याचा जोर जगातल्या सर्व बंदुकांना भारी ठरेल!

लॉर्ड केन्स आणि कार्ल मार्क्स या दोघांनी विचाराचे हे सामर्थ्य ओळखले आहे. केन्स म्हणतो – " जग (नवीन) विचारांच्या अंकित आहे. विचारांचे सामर्थ्य आपणांस वाटते त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहे."

विचारापेक्षा हिंसाचारावर माओचा विश्वास असता तर गेली तीन वर्षे तो सांस्कृतिक क्रांतीसाठी झगडला नसता.

आमच्या गावठी माओंचे आणि गावठी गांधींचे दुर्दैव हे की ते हे उघड सत्य पाहू शकत नाहीत. संप्रदाय ही त्यांची सुरुवात आणि हीच त्यांची अखेर !

नक्षलवादाचा दुसरा कमकुवतपणा म्हणजे तो माओवादावर निष्ठा ठेवीत नाही तर माओवर ठेवतो. हे खास भारतीय वैशिष्टच आहे. बंदुकीच्या सिद्धांताचा माओचा अर्थ असा आहे की, सर्व जग साम्यवादाच्या छत्राखाली यईपर्यंत प्रत्येक देशाचे स्वातंत्र्य व अस्तित्व शस्त्रबळावरच अवलंबून आहे. माओचे हे वचन हे केवळ या अर्थाने व ट्रान्झिशनल स्वरूपाचे आहे. ते अंतिम व पूर्ण सत्य नाही. राष्ट्रवादाचे पतन होत असले तरी ते पूर्ण होण्यास अजून कित्येक शतके लागतील. माओ झाला तरी त्याला हे सत्य नाकारता येत नाही, म्हणून तो आपले तत्त्वज्ञान मुळात राष्ट्रवादी ठेवून त्याला आंतरराष्ट्रीयत्वाची डूब देत आहे.

आणि अंतिम साम्यवादाच्या वा साम्ययोगाच्या दृष्टीने हा पवित्रा आवश्यक आहे. हे करीत असताना माओ सांगतो, ग्रामीण अर्थव्यवस्था अशी उभारा की तिच्यात भांडवलदारी उत्पादन व वाटपपद्धती नसेल. स्वयंपूर्ण व परस्पर सहकारी खेड्यांवर आधारित अशी अर्थरचना हे माओचे स्वप्न आहे. माओ मूलतः आशियाचा आहे. रशियन साम्यवादाचे वैचारिक सावट त्याने झुगारले ते एवढ्यासाठी !

मग प्रश्न उभा राहतो तो असा की, भारताच्या दृष्टीने यात नवीन काय आहे ? खरे तर काहीच नाही. राजेशाही, लोकशाही, समाजवाद, साम्यवाद ही सर्व पश्चिमेची अपत्ये आहेत. ती भारतात व आशियात येऊन काही काळ वरचष्मा गाजवतील पण ती येथे परकी आहेत. भारताची मूळ प्रकृती आहे ग्रामसभेची ! जी पुन्हा प्रस्थापित होईल.

नक्षलवादी चळवळीचे यश हे की, तिने ग्रामीण व गिरीजनांचे दुःख वेशीवर टांगले. तिचे अपयश हे की हे दुःख टांगण्यासाठी तिने वेस जी निवडली आणि दोर जो निवडला तो परकी आहे की ज्यांची आम्हांला काही गरज नाही.

नक्षलवादी चळवळीचे ऐतिहासिक कार्य संपले आहे. आता जे राहील ते केवळ परोपजीवी, सत्तापिपासू, व्यक्तिनिष्ठ असे राजकारण. पण या राजकारणासही प्रतिष्ठा राहणार नाही; कारण या प्रयत्नांत ही चळवळ माओपेक्षा माओनिष्ठ होण्याचा केविलवाणा प्रयत्न करणार आहे. अशी अवस्था नेहमीच तिरस्करणीय असते. सूर्यापेक्षा वाळू जास्त तापते म्हणून तिला सूर्याची प्रतिष्ठा येत नाही.

[ क्रमशः ]




९ ऑक्टोबर १९६२ ला अंधार पडण्यापूर्वीच मेजर चौधरी यांच्या नेतृत्वाखाली ९/ पंजाब या तुकडीचे जवान सेंग-जाँग या ठिकाणी जाऊन पोचले. त्या ठिकाणी वस्ती अशी नव्हतीच. राजपूत तुकडीला नाम का-चू नदी कुठून कशी सुरक्षितरीत्या पार करता येईल या दृष्टीने पाहणी करून त्यांनी दोन जागा पाहून ठेवल्या होत्या आणि त्या प्रत्येक जागी त्यांनी लहान लहान जवानांच्या टोळ्या उभ्या करून ठेवल्या होत्या. यापैकी एक जागाच पुढे लॉग ब्रीज या नावाने प्रसिद्धीला आली.

१० ऑक्टोबर १९६२ ला पहाटे ५ वाजता मेजर चौधरी आणि त्यांच्याबरोबर असलेले ५० जवान यांच्यावर उखळी तोफांच्या सहाय्याने सुमारे ८०० चिन्यांनी हल्ला चढवला. आपले ५१ तर त्यांचे ८०० ! कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही पण संख्येत इतकी प्रचंड विषमता असून देखील आपले शूर पंजाबी जवान मागे हटेनात. आपल्या जवानांनी असा अचूक आणि भरमसाट गोळीबार करून त्यांना सणसणीत जबाब दिला की चिनी देखील आश्चर्याने थक्क झाले. पहिल्याच सलामीला अनेक चिनी सैनिक खाली कोसळले. मेजर चौधरींनी आपली एक तुकडी कार्पोला 2nd च्या पायथ्याशी अगोदरच पाठवली होती आणि तिथून आपले जवान चिन्यांवर ही आग ओकत होते. चिनी सैनिकांना हुकूम दिला गेला की ' पुढे जाऊ नका! मागे या ऽ ऽ ! ' चिनी सैनिक सुरुवातीला मागेच हटले. पण त्यानंतर मात्र त्यांनी त्यांची व्यूह रचना सावरली आणि तीन दिशांनी सतत आणि एकाच वेळी हल्ले चालू केले. अखेर आपले पंजाबी जवान जेरीस आले कारण आपला १ जवान तर त्यांचे २० चिनी सैनिक हे संख्येचे प्रमाण होते. मेजर चौधरी जखमी झाले. तरी देखील धाडसाने आणि निश्चयाने लढत राहिले. या चकमकीत आपले ६ जवान

लेखक : ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद : ॲडव्होकेट माधव कानिटकर

लेखांक : एकवीस

मेले आणि ११ जण जबर जखमी झाले. या चकमकीत पहिल्या सलामीलाच १०० चिनी सैनिक जखमी झाले असे खुद्द चिन्यांनी कबूल केले म्हणज त्यांचे खरे किती सैनिक जखमी झाले असतील किंवा मेले असतील याचा अंदाज करा. सुरुवातीचा आपल्या जवानांनी त्यांना दिलेला दणका इतका जबरदस्त होता. चिन्यांनी त्याचा बदला घेतला आणि ताबडतोब आपल्याला भरपूर प्रायश्चित्त दिले. जनरल कौल हे पाहून हादरून गेले. त्यांची पहिली प्रतिक्रिया अशी होती की, 'छेः! छेः! आपले जवान इतका मार खातील यावर माझा विश्वास बसत नाही.' पण नंतर मात्र त्यांचा भ्रमनिरास झाला. त्यांना धक्का बसला. ते ओरडले 'अरे बाप रे! तुमचे म्हणणे खरे ठरले! नाम का-चू नदीच्या पलीकडे आपल्याला येऊच द्यायचे नाही असे त्यांनी ठरविलेले दिसतय!' इतके दिवस आम्ही हेच जनरल कौलना सांगत आलो होतो. पण त्यांनी ते ऐकले नव्हते. दिल्लीत प्रचलीत असलेल्या प्रशंसेने ते अशा कृती करीत आले होते की त्यांचा प्रशंसेवरच जास्त विश्वास बसला होता.

त्यानंतर लगेच माझ्याकडे वळून ते म्हणाले "या लढाईची जबाबदारी तुझी आहे. कारण तुझी ब्रिगेड लढत आहे!' अस्से! अडचणीत सांपडल्याबरोबर जबाबदारी ब्रिगेड कमांडरची झाली! आतापर्यंत भारत सरकारच्या मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या आज्ञा पालनाची भाषा बोलली जात होती. या एकाच ब्रिगेडचे नेतृत्व कुणी करायचे? योजना कशी आखायची? याची चर्चा प्रत्येकजण करीत होता.

नशीब आपलं की चुमसोला (Yumtsola) या ठिकाणी जायला निघालेल्या आपल्या २/ राजपूत या तुकडीने नाम का-चू नदी ओलांडण्यापूर्वीच चिन्यांनी हा हल्ला चढवला, नाहीतर २/ राजपूत या तुकडीचा देखील चिन्यांनी धुव्वा केला

असता. कारण १०,५०० फूट उंच चढून गेल्यानंतर आपल्या जवानांना एक सरळसोट उभा कडा चढून जाऊन १५,००० ते १६,००० फूट आणखी वर उंच जाऊन संभाव्य लढाईला तोंड द्यायचे होते. तशातच त्यांच्यापैकी प्रत्येकजण फक्त १०० फैरी झाडू शकेल इतपतच दारुगोळा त्यांच्याकडे होता. त्याहीपेक्षा उंच ठिकाणी थागला रीजमध्ये ठाण मांडून बसलेले चिनी आपल्या जवानांच्या या हालचाली सहज न्याहाळू शकत होते. आपले १६,००० फूट उंचीवर चढून जाऊन पोचणारे जवान तिथे पोचतानाच थकणार होते. चिन्यांनी जरी एकही फैर न झाडता असा विचार केला असता की 'अखेर कुठे चाललेत भारताचे जवान ? चुमसोला (Yumtsola) चा कवजा घेण्यासाठीच ना ? खुशाल जाऊ द्यात त्यांना ! तरीदेखील आपले जवान तिथे थंडीमुळे मेले असते. त्यांना कुणीही वाचवू शकले नसते. चुमसोला (Yumtsola) या ठिकाणी आपल्या जवानांनी उभारलेल्या तटबंदीकडे चिन्यांनी दुर्लक्ष केले असते. कशाला मारायचे त्यांना ? नाहीतरी मरणारच आहेत थंडीने ! लष्करी दृष्टचा पुढच्या जवानांनी मागच्या जवानांशी जो संपर्क ठेवायचा असतो तो हे जवान ठेवू शकणार नव्हते. त्यांना मागून रसद पोचवली जावू शकत नव्हती. चिनी लष्करी अधिकाऱ्यांच्या हे लक्षात आले की 'यांना मारण्याची जरूर नाही ! कारण हे भारताचे जवान फक्त मरण्यासाठीच पुढे चालल्येत. एकदा का चिनी सैनिकांच्या मागे गेले की बरीच कामे आपोआप होणार आहेत. एकतर त्यांचा रस्ता तुटेल ! भारतीय सैन्याशी त्यांचा संपर्क राहणार नाही कारण चिनी सैन्य मध्ये आहे. दुसरे म्हणजे हे भारतीय जवान बहुतकरून भुकेने मरतील आणि नाहीच मेले तर त्या अर्धपोटी, दमलेल्या जवानांना ठार करायला वेळ किती ? त्यांच्या मागे चिनी आणि पुढेपण चिनी ! आपणहून जवड्यात येताहेत, येऊ देत !"

माझी खात्री आहे की चुमसोला (Yumtsola) या ठिकाणी भारताची एक सबंध बटालियन येणार आहे याची चुणूक जरी का चिन्यांना लागली असती तरी त्यांनी जरा थांबून आपल्या बटालियनची वाट पाहिली असती. कारण आपल्या जवानांच्या हालचाली दिवसा ढवळ्या घडवून आणण्यात येत होत्या आणि चिनी वरून त्या पाहत होते. योग्य वेळी चिन्यांनी आपल्या सबंध बटालियनची कत्तल केली असती किंवा त्यांची नाकेबंदी करून, त्यांची रसद तोडून त्यांना हळूहळू भुकेने मारले असते.

मेजर चौधरींच्या तुकडीवर चिन्यांनी भीषण गोळीबार चालू केल्याबरोबर मी जनरल प्रसादना एकीकडे घेऊन म्हटले की, "तुम्ही तरी निदान जनरल कौलना सांगा की इथली परिस्थिती लक्षात घेऊन 'चिन्याना हुसकून देण्याची' भाषा सोडून द्या आणि सत्य परिस्थिती जाणून घेऊन पुढे गेलेल्या जवानांना मागे यायचा हुकूम द्या !" पुढे जनरल कौलनी जेव्हा मला विचारले की "प्राप्त परिस्थितीत

काय करावे ? तुझे काय मत आहे ?" तेव्हा मी जनरल कौल आणि जनरल प्रसाद यांच्याजवळ असे मत व्यक्त केले की "आपल्या कबजात असलेल्या चौक्यांचे आपण संरक्षण करावे पण एरव्ही नाम का-चू मधून आपण ताबडतोब काढता पाय घ्यावा. लुपू या ठिकाणी मुख्यतः रसद टाकली जाऊन तिथे साठे करण्यात यावेत. पूल क्रमांक ३ आणि ४ इथे असलेल्या जवानांना रसद मिळावी म्हणून सांगधर या ठिकाणची मदत घेऊन तिथेही थोडी रसद टाकली जावी. जवानांचे अन्न फेअर-चाईल्ड पॅकेटस मधून खाली टाकणे हे इथून पुढे आपण ताबडतोब थांबवले पाहिजे कारण त्यामुळे अन्नाची नासाडी होत आहे. मी त्यांना याची आठवण करून दिली की आता माझ्या ब्रिगेडसाठी फक्त ४ दिवस पुरेल इतपतच अन्न आपल्या जवळ आहे. मेजर चौधरी आणि त्यांचे १०० जवान यांच्या राखीव अन्नाच्या साठ्यात कपात करण्यात आलेली आहे कारण एकूण १,००० जवानांच्या दोन बटालियन्स दररोज पोसायच्या आहेत. मेजर चौधरी आणि त्यांची कंपनी आता फार फार तर ४ दिवस जेवणखाण करू शकेल. सांगधर या ठिकाणी टाकली जाणारी रसद आधीच तुटपुंजी आहे. तशातच आपल्याकडे पुरेसे हमाल नाहीत याचा अर्थ आपल्याला इथे नुसते जिवंत राहता येणेही कठीण जाईल आणि आपल्याकडे ही परिस्थिती असताना समोर चिन्यांची एक सबंध डिव्हीजन त्यांनी आणून ठेवलेली आहे."

जनरल कौल आणि जनरल प्रसाद यांना माझे म्हणणे पटले, हे महत्त्वाचे आहे.

ज्या वेळी आमची ही चर्चा चालू होती त्या वेळी माझ्या ब्रिगेडची परिस्थिती गंभीर होती. सेंग-जाँग या ठिकाणी चिन्यांनी आपल्या पंजाबी तुकडीचा चक्काचूर करून टाकला होता. २ राजपूत ही तुकडी अक्षरशः एकांड्या शिलेदारांसारखी चुमसोला (Yumtsola) या ठिकाणी पोचण्याच्या उद्देशाने लॉग ब्रीजच्या दिशेने एकटीच वाटचाल करीत होती. बटालियन हेड क्वार्टरने पूल क्रमांक ४ ओलांडताच चिन्यांनी गोळीबार सुरू केला. समोर चिन्यांनी खंदक खणून ठेवलेले आहेत हे दिसत होते. याच परिस्थितीचे वर्णन जनरल कौलनी कुठल्या शब्दांत केलेले आहे ते पाहा. जनरल कौल म्हणतात, "आदल्या दिवशी दिलेल्या हुकमाप्रमाणे २। रजपूत ही आपली तुकडी लॉग ब्रिजच्या दिशेने आगेकूच करीत आहे हे मी पाहिलं ! कारण त्यांना त्या ठिकाणी आणि दुसऱ्या एका तुकडीला सेंग-जाँग ह्या ठिकाणी जाण्याचा हुकूम दिला गेला होता. आपले जवान घाई-गर्दीनं अनेक ठिकाणी पुढं जात होते ! (Our men were rushing up to various positions ! )

सेंग-जाँग या ठिकाणी गेलेल्या आपल्या जवानांना चिन्यांनी जे प्रायश्चित्त दिलं ते मी पाहिलं असे जनरल कौल म्हणतात. (ब्रिगेडिअर जे. पी. दळवी नव्हे ! ) आणि वर ते असेही म्हणतात की, "या बिकट परिस्थितीचे गंभीर परिणाम काय होणार आहेत हे मी समजून चुकलो होतो. माझ्या मनात असा

विचार आला की एकूण परिस्थितीचा फेरविचार करायला पाहिजे !" हे घ्या जनरल कौलचे मूळ इंग्रजी वाक्य :–

(" Fully understood all the imblications of our predicament; and thought that the whole position in this theatre should be reconsidered " ) अक्कल गुंग करून टाकणारा चिन्यांचा तडाखा पाहून जनरल कौल धडा शिकले होते, की इथून पुढे चिन्यांनी व्यापून टाकलेल्या अजिक्य बालेकिल्ल्यातून त्यांना हुसकणे अशक्य आहे; एवढेच नव्हे तर थाग-ला प्रदेशात इथून पुढे शांततामय सहजीवन हीं (Peaceful co-existence) अशक्यच आहे. जनरल कौल यांच्या जबरदस्त आशावादाच्या फुग्यातली हवा गेली ! जनरल कौल यांनी हे ओळखले की, " प्रत्येक बाबतीत चिनी आपल्यापेक्षा वरचढ आहेत. धोला हे ठिकाण म्हणजे एक विवर आहे. त्या प्रदेशात आपल्या चौक्या लढवणे केवळ अशक्य आहे. तशातच लढण्याच्या दृष्टीने आपल्याकडें अनेक गोष्टींची कमतरता आहे, की ज्यांची पूर्ती थोडचा दिवसांत करता येणे शक्यच नाही. दारूगोळा तर कमी आहेच; तशातच १ डिव्हिजन या तयारीनिशी आलेल्या चिन्यांनी असं ठरवलेलं दिसतंय की, नामका–चू नदीच्या उत्तरेकडे एकाही भारतीय जवानाला पाऊल टाकून देणार नाही. "

जनरल कौलनी अखेर रोगाचे अचूक निदान केले होते तर ! तरीदेखील लवकरच मूर्खपणाचा कळस होणार होता. प्रतिकूल परिस्थितीत आपण अशक्य ते शक्य करायला जाणार होतो. चिन्यांनी त्यांची ताकद आणि हेतू दाखवून दिले होते. आपल्या जोखमीच्या मोहिमेत तयारीपेक्षा बडबडच जास्त होती. जनरल कौलना एवढंही भान राहिले नाही की, अशा परिस्थितीत थोडेफार मागे यावे आणि ज्या ठिकाणावरून आपण लढू शकतो अशा ठिकाणी जावे. लढाईत सुरुवातीला कोण मागे आला याला महत्त्व नसते तर अखेर पुढे कोण गेला याला महत्त्व असते. जनरल असूनदेखील कौलसाहेब या बाबतीत काय करायचे याचा पंडित नेहरूंकडून सल्ला घेणार होते ! त्यांनी असे भासवले की, ता. ५ ऑक्टोबरला आपण ज्या ठिकाणी होतो तिथपर्यंत मागे येऊन 'जैसे थे' परिस्थिती निर्माण करायची की नाही, हे इथली परिस्थिती भारत सरकारच्या मंत्रीमंडळाला कळवून सरकारकडून तशा तऱ्हेचा नवा हुकूम मिळाला की मगच ठरवता येईल/ आपण पुढे जाऊन चिन्यांवर केलेला हल्ला फसलेला आहे हे लष्करीदृष्टचा समजल्यानंतर दिल्लीकडून मिळणाऱ्या हुकमाची वाट पाहत बसायची काय जरुरी होती ? सरळ सरळ योग्य तो हुकूम देण्याचा अधिकार त्यांना नव्हता ? कदाचित जनरल कौलना अशी भीती वाटत असेल, की आता जर का जवानांना मागे यायचा हुकूम दिला तर जनरल कौलशी फारसे चांगले संबंध नसलेले भारतीय लष्करातले अधिकारी त्यांना टोमणे मारतील ! विचारतील की, " अरे, काय रे हे ! तूच तर

थाटात सांगत होतास, की 'लवकर पुढं जा!' मग आता "लवकर मागं या कशाला?"

शिवाय दिल्लीच्या राजकीय वर्तुळातदेखील जनरल-कौलचे शत्रू होतेच. त्यांनी काय कमी खिजवले असते त्यांना? दुसरे म्हणजे जनरल कौलना स्वतःवर पराभवाची जबाबदारी घ्यायची नव्हती. दिल्लीहून हुकूमच आला असता म्हणजे जनरल कौलना बचाव घेता आला असता की 'वरून हुकूम' आला म्हणून मी तसे केले!

जनरल कौल यांचा असा दावा आहे, की त्यांनी स्वतः कुठलाच हुकूम दिला नव्हता. पराभवाची जबाबदारी त्यांच्यावर नाहीच! १० ऑक्टोबर १९६२ ला धोलाहून दिल्लीला जाण्यापूर्वी जनरल कौलनी हे हुकूम दिले होते.

१. मी परत येईपर्यंत चिन्यांना हुसकून द्यायचा निर्णय लांबणीवर टाका.

२. तोपयर्यंत नामका-चू नदीच्या दक्षिणेकडे राहून फक्त एवढीच काळजी घ्या, की कुठल्याही परिस्थितीत पूल क्रमांक १ वरून आपण केव्हाही नदी पार करू शकू.

३. उत्तर काठावर असलेले आपले सांगले हे ठिकाण सोडू नका. G. O. C. 4th डिव्हीजनच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणचे संरक्षण करा. मात्र जर का चिन्यांकडून धोका उत्पन्न झाला तरच ते ठिकाण सोडून द्या.

४. लुंपूपासून आघाडीपर्यंतचा संपर्क तुटू देऊ नका.

५. ह्यथुंग-ला कुठल्याही परिस्थितीत सोडू नका.

आणखी एक पाऊल पुढे जाऊन कौलनी व्यक्तिशः रजपूत तुकडीच्या कमांडिंग ऑफिसर्सना काही खास हुकूम दिले, श्री. रीख यांना त्यांनी असे सांगितले की, "आता परिस्थिती बदललेली आहे. असे काही होईल ही कल्पना नव्हती. चिन्यांनी भयंकरच बदला घेतलाय. इथून जास्त पुढे जाऊ नकोस! नामका-चूच्या दक्षिणेकडे पूल क्रमांक ३-४ व तात्पुरते पूल या प्रत्येक पुलाजवळ एक एक कंपनी ठेव."

त्यावर रीख म्हणाले की, "साहेब, चिन्यांनी हल्ला चढवला तर ही ठिकाणेदेखील सोडावी लागतील!" त्यावर जनरल कौल यांनी उत्तर दिले की, "काही काळजी करू नको रे! चिनी हल्ला करणार नाहीत. हे युद्ध फार काळ चालेलसें वाटत नाही. मात्र नामका-चू नदी आपण ओलांडता कामा नये. आपण आता आपल्या कबजात असलेली एक इंच जमीन देखील सोडायची नाही!"

अखेर धोला पडले! कारण कुचकामी पुलांचे संरक्षण करण्याचा हुकूम जनरल कौलनी दिला होता. आपण नामका-चूचे संरक्षण करू शकलो नाही आणि नामका-चू आपले संरक्षण करू शकले नाही. ऐन युद्धात आपले सैन्य चुकीच्या ठिकाणी पाठवलं जातंय हे पाहिल्याबरोबर मार्शल Berthier ला नेपोलियन बोनापार्टने रागाने विचारले होते की, "काय, विचार काय आहे? आपण गांजा आणि अफू

असले मनाई असलेले पदार्थ आपल्या देशात येऊ नयेत म्हणून पहारा करण्यासाठी तर पुढं जात नाही आहोत ना ? " कौल कशासाठी पुढे जात होते ?

प्राप्त परिस्थिती आणि संभाव्य परिणाम जर का जनरल कौलनी भारत सरकारला कळवले असते, तर ७ वी पायदळ तुकडी चिन्यांची 'युद्धकैदी' बनलीच नसती. ही तुकडी लुंपूपासून पुढे जाऊ द्यायला नको होती. कसे पुढे जायचे हे न सांगताच कुठपर्यंत पुढे जायचे हे सांगणारे सरकार जगात कुठेही नसेल. जनरल कौलचे खरे क्षेत्र लष्करी होते. ते विसरून जाऊन ते राजकारणाला बळी पडले आणि त्यांनी भलतीच जबाबदारी स्वीकारली.

१० ऑक्टोबर ६२ ला आहात ती ठिकाणे एक इंचदेखील सोडू नका, असा हुकूम देणे ही जनरल कौलची तिसरी घोडचूक होती.

सेंग-जाँग या ठिकाणी आपली चिन्यांशी चकमक झालेली आहे. ते आता आपल्या एखाद्या जनरलचादेखील खून पाडायला कमी करणार नाहीत हे लक्षात घेऊन मेजर पवार आणि त्याच्या हाताखालची गुरखा कंपनी यांना सांगितले की, जनरल कौल आणि जनरल प्रसाद यांना संरक्षण द्या. त्या दोघांना पुढे घेऊन जाणाऱ्या 4 Grenadiers कडून संदेश घेऊन ते तुम्हांला मोकळे करीपर्यंत मेजर पवार, तुम्ही या दोन जनरल्सच्या बाजूने चला. या वेळपर्यंत सगळाच गोंधळ झाला होता. पूल क्रमांक ३ व ४ जवळ असलेल्या रजपूत तुकडीची एक कंपनी पूल क्रमांक १ जवळ पंजाबी तुकडीच्या अधिपत्याखाली होती. कारण थाग-ला प्रदेशात टेहळणी करण्यासाठी मीच २५ सप्टेंबरला एक पंजाबी कंपनी थाग-लामध्ये पाठवली होती. आणि तिथली तूट भरून करण्याकरता १ रजपूत कंपनी पंजाबी तुकडीत शिरली होती. तिथून पश्चिमेकडे १२ मैलांवर एक पंजाबी तुकडी होती तर एक गुरखा कंपनी हाथुंग-ला पूल क्रमांक १ जवळ होती. घाईगर्दीने गोंधळ माजवल्याचा परिणाम होता हा ! तुम्ही काहीही म्हणा. आम्ही लष्करी माणसे पक्की जातीयवादी आणि प्रतिगामी असतो. संकुचित मनोवृत्तीचीं मात्र नसतो ! कारण आपण सर्वप्रथम भारतीय असलो तरी लष्करी शिस्तीप्रमाणे महार रेजिमेंटचा माणूस महार रेजिमेंटबरोबर आणि मराठा रेजिमेंटचा मराठा रेजिमेंट बरोबरच पाहिजे !

जनरल कौल दिल्लीला जाण्यासाठी म्हणून आम्हांला सोडून गेल्यानंतर सेंग-जाँग या ठिकाणी आपल्या कशा चिंधड्या उडताहेत तिकडे मी लक्ष घातले. पूल क्रमांक ४ जवळून मी ही लढाई सहज बघू शकत होतो. बलदंड चिनी आपल्या शूर पंजाबी जवानांची कशी वाताहत करून टाकताहेत हे पाहत असताना माझ्या अंत:करणाला किती यातना होत होत्या, ते माझ्या बाजूला उभ्या असलेल्या प्रत्येक जवानाला ठाऊक आहे ! मी कळवळून मनात म्हटले, 'काय हे ? फुक्कट मरणार आहेत बिचारे.' आपलाच नाश करून टाकणाऱ्या जनरल कौल यांच्या 'पोझिशनल वॉरफेअर'च्या तत्त्वाचा मी त्रिवार धि:कार केला. मला कळेना की,

चिन्यांच्या मागे जाऊन बसण्यात काय शहाणपणा होता ? तिथे काय त्यांचे हृदय-परिवर्तन करायचे होते का सत्याग्रह ? कसली लढाई ही !

... आणि अखेर माझ्या आयुष्यात मनाला असह्य वेदना देणारा तो क्षण आला. जखमी झालेले मेजर चौधरी निराशेने मागे वळून ओरडले, "अरे! नुसते बघता कायऽऽ! चालू करा मशिनगन्स आणि तोफा, वाचवा माझ्या जवानांना !" कर्नल मिश्रा यांनी त्यांचे म्हणणे मला समजावून सांगितले आणि कळवळून ते म्हणाले, "साहेब. ताबडतोब मदत द्या ! हे पाहवत नाही !" पूल क्रमांक ४ जवळ आणलेल्या तोफा आणि मशिनगन्सकडे मी नुसतं पाहिलं. त्या निर्जीव वस्तूदेखील मला जणू काही ओरडून सांगत होत्या की, "पाहवत नाही रे हे ! नुसती बत्ती दे आणि चाप ओढ आणि बघ एक एक चिनी कसा हवेत उडेल ते !"

पण मीच हुकूम दिला की दारूगोळा फेकू नका ! का ? मेजर चौधरी आणि आपले जवान मरावेत म्हणून ? छे: ! छे: ! मी मदत दिली नाही याचे कारण असे होते की, आणीबाणीच्या प्रसंगीच नेहमी डोके शांत ठेवावे लागते. एकदम भडकून चालत नाही. कमांडर या नात्याने मी हे केले. विचार केला की जर का मी इथून गोळीबार चालू केला तर १२ मैलांच्या परिसरात चिनी मोठे युद्ध चालू करतील. आणि आपल्याला पार मागे रेटवून देतील. युद्धशास्त्राचे असे तत्त्व आहे, की आपली लहानशी तुकडी आपल्या डोळ्यांदेखत मेली तरी चालेल. फार फार तर ते बघताना मनाला असह्य यातना होतील. पण आपली मूळ मोहीमच धोक्यात येईल असे कुठलेही कृत्य कमांडरने एकदम डोके भडकवून घेऊन करू नये !

मेजर चौधरींना मी मदत द्यायचे नाकरले याचे दुसरे कारण हे होते, की आपल्या तोफगोळ्यांची ताकद फक्त २७०० यार्डापर्यंत जाण्याची होती आणि सेंग–जाँग हे ठिकाण २७०० यार्डापलीकडे होते. मी जरी तोफगोळे आणि मशीन-गन वापरण्याचा हुकूम दिला असता तरी काही उपयोग नव्हता. एकही चिनी सैनिक मेला नसता. फक्त दारूगोळा फुकट गेला असता !

समोर घडत असलेले महाभारत मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहत होतो. कशी होत होती ती विजोड लढाई ?

[ क्रमशः ]

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher.

# चंद्रावरील वसाहती....

पहिले प्रेम, पहिले फूल, पहिले मूल. पहिल्याची गोडी दुसऱ्यात नाही.......एक वेडीपिशी लहर साऱ्या शरीराला लपेटून टाकते. नेहमीचे, ओळखीचे, परिचयाचे शब्दसुद्धा जागोजाग अडतात.

— होय ! पृथ्वीवरच्या मानवाचे पहिले वहिले पाऊल आता चंद्राला लागले आहे. एक अद्भुत स्वप्नसृष्टीतली गोष्ट आता कायमची सत्यसृष्टीत नोंदवली गेली आहे !

पण नव्याचे नवेपण हळूहळू कमी होते. जीवनाला अगदी नकळत, वास्तवाचा एक ओझरता स्पर्श होतो. एक साधासुधा प्रश्न मनात येतो. चंद्रावर उतरण्याचा हा एवढा विलक्षण हट्ट मानवाने कशासाठी धरला होता ? केवळ अमेरिका आणि रशिया यांची आपसांतील स्पर्धाच याच्यामागे होती का ? काय मिळवलं एवढा अफाट खर्च करून मानवानं ?


रुपये, आणे, पै यांच्यात जीवनाचा विचार सुरू झाला की, नेहमीच हे अरसिक प्रश्न मनात येतात. व्यवहारात हे प्रश्न एकवेळ ठीक आहेत—पण भावनात्मक संबंध आणि वैज्ञानिक साहस यांच्यांत हे प्रश्न हास्यास्पद असतात. फॅरेडेचे विद्युतविषयक नवे सिद्धांत ऐकून एका व्यवहारी बाईने त्याला प्रश्न विचारला होता, "फॅरेडे, या तुझ्या संशोधनाचा उपयोग काय ?" फॅरेडेने तिला उत्तर दिले होते, "बाई ! तुम्ही जन्म दिलेल्या मुलाचा जो उपयोग आहे तोच माझ्या संशोधनाचा आहे !"

शेवटी मूलभूत संशोधन वा एखादे वैज्ञानिक साहसच साऱ्या जगाचे रंगरूप पालटवू शकते. कोलंबसाचे पाय अमेरिकेला लागले आणि त्यानंतर साऱ्या युरोपचे चित्र कायमचे पालटून गेले. अगदी त्याचप्रमाणे ज्या क्षणी नीलची पावले चंद्रावर टेकली त्याच क्षणी आपण राहतो त्या पृथ्वीचे स्वरूप कायमचे बदलविण्याची एक अखंड प्रक्रिया सुरू झाली.

## आधुनिक विज्ञानेश्वरी

दत्तप्रसाद दाभोळकर


कोलंबस आणि नील यांची तुलना ऐकून कदाचित हसू येईल तुम्हांला! तुम्ही म्हणाल, अमेरिका आणि युरोप यांच्यांत फक्त तीन हजार मैल अंतर होते. वाटेत होता फक्त एक समुद्र. इकडे चंद्र तर पृथ्वीपासून दोन लाख चाळीस हजार मैल अंतरावर आहे. वाटेत आहे एक विलक्षण पोकळी. पण कृपया एक गोष्ट नजरेआड करू नका. कोलंबसाच्या वेळी – १४९२ साली – समुद्रमार्गे अमेरिकेला जाण्यास जेवढा वेळ लागे त्या मानाने चंद्रावर जाण्यास लागणारा वेळ कमी आहे. १४९२ साली समुद्रमार्गे अमेरिकेत जाण्यात जो धोका होता त्यामानाने चंद्रप्रवास करण्यातला धोकाही कमी आहे. स्पष्ट सांगावयाचे तर कोलंबसाचे अनुयायी होण्यापेक्षा नीलचे अनुयायी होणे अधिक सोपे आहे! अधिक सुरक्षित आहे!



ही कल्पना आहे डॉ. आयझॅक ॲसिमॉव यांची. त्यांच्या मते पुढचे पाउल म्हणून यानंतरच्या आपोलोत दोन चांद्रयाने असतील. त्यापैकी एका चांद्रयानात चंद्रावर संशोधन करण्यासाठी आपण जी साधनसामुग्री नेणार ती ठेवली जाईल. याच चांद्रयानातून चंद्रावर गोळा केलेले नमुने अपोलोकडे पाठवले जातील. दुसरे चांद्रयान म्हणजे डाक सुरक्षीत घर असेल. या घरात चंद्रप्रवासी चौदा दिवस मुक्काम करतील. चंद्रावर केवढीही कडक थंडी वा उन्हाळा असो हे घर आपल्या चंद्रप्रवाशांना संरक्षण देउ शकेल.

— चंद्रावर जाण्याचे एक वेळ ठीक आहे. पण पृथ्वीवरचा मानव चंद्रावरच्या हवामानात जगू शकेल का? चंद्रावर दिवसा २०० अंश सेंटिग्रेडइतके तपमान असते. रात्री तेच तपमान शून्याखाली २०० या आकड्यावर जाऊन स्थिरावते. पुन्हा चंद्रावरचा दिवस असतो १५ दिवसांचा. रात्र असते १५ दिवसांची. त्यातून चंद्रावर कायम उल्कांचा पाऊस कोसळत असतो......होय! हे सारे खरे आहे. पण या असल्या अफलातून वातावरणात मानव सुखासमाधानाने राहू शकेल हे पण खरे आहे! मानवी शरीरांचा लवचिकपणा केवढा विलक्षण आहे हे तुम्ही विसरता आहात. मानव उत्तर ध्रुवावर राहतो आणि आफ्रिकेतही राहतो. दाट जंगलात त्याने खेडी वसवलीत आणि समुद्र हलवून त्याने टोलेजंग इमारती पण उठवल्यात. एकदा का मानवाने चंद्रावर भुयारी घरे बांधली, तिथल्या हवामानाला पेलेल असा वेश स्वीकारला की मानव चंद्रावर सहज रुळेल.


ठीक आहे. ही गोष्ट मान्य होण्यासारखी आहे. पण तरीही एक महत्त्वाचा प्रश्न उरतोच! मानवाला जगण्यासाठी प्राणवायू हवा, अन्न हवे, पाणी हवे. या तीनही



त्याचवेळी चंद्रावर तात्पुरती निवासस्थाने उभारावी लागतील. सहा अंतराळवीर या निवासस्थानात राहू शकतील. वर्तुळाकार दिसणारे त्यांचे घर लहानमोठे करता येईल. घराच्या मागील बाजूस विद्युतशक्ती निर्माण करणारे अणूकेंद्र असेल. या घरात चंद्रप्रवासी काही आठवडे मुक्काम करतील. चंद्राची माहिती मिळवत असतानाच त्यांना चंद्रावरून अंतरिक्षाचा पण अभ्यास करावयाचा आहे.

गोष्टींचा चंद्रावर खडखडाट आहे. अन्न, पाणी, हवा नसेल तर मानव चंद्रावर राहू शकेल का ?

— या प्रश्नांचा आपण जरा शास्त्रीय परिभाषेत शास्त्रीय दृष्टिकोणातून विचार करूया. आपल्या आजच्या ज्ञानाप्रमाणे चंद्रावर पाणी नाही याचा अर्थ चंद्राच्या पृष्ठभागावर पाणी नाही एवढाच आहे ! पाणी ही आपल्या विश्वातील एक सर्वसामान्य सर्वव्यापी गोष्ट आहे. चंद्राच्या पृष्ठभागात आत खोलवर पाणी नसेलच असे आपण खात्रीलायकपणे सांगू शकत नाही; किंबहुना चंद्र जर पृथ्वीचा एक तुकडा म्हणून अंतराळात फेकला गेला असेल तर चंद्राच्या अंतरंगात पाणी असण्याची शक्यता खूप आहे. हे पाणी खूप नसेल पण काही हजार माणसांच्या वसाहतीला ते काही वर्षे सहज पुरे पडेल. चंद्रावर माती आणि खनिज पदार्थ आहेत. नत्रवायू आणि कर्बद्विप्राणील वायू आहे. म्हणजे चंद्रावर तुम्ही वनस्पती वाढवू शकाल ! त्या वनस्पती वाढाव्या म्हणून कृत्रिम प्रकाश मात्र आपणाला निर्माण करावा लागेल. पाहिजे तर या वनस्पतींवर प्राणी वाढविता येतील. मांस व भाजीपाला यांचा प्रश्न असा निकालात निघेल. चंद्रावरच्या पाण्याचे विद्युत पृथःकरण केले की प्राणवायू मिळेल.



असेच आणखी काही दिवस जातील. आता माणूस चंद्रावर रुळला असेल. त्याने आता चंद्रावर पक्की घरे बांधलीत. ही घरे भुयारी आहेत. चंद्रावर पडणारा उल्कांचा पाऊस, उन्हाळा, हिवाळा, या साऱ्यापासून तो आता कायमचा सुरक्षित आहे. चंद्रावर खाणी खणण्याचे काम त्याने आत्तापर्यंत हाती घेतले असेल. ¤

कल्पनाशक्ती खूप ताणूनसुद्धा आज या कल्पना कदाचित तुमच्या गळी उतरणार नाहीत. ठीक आहे. दुसरी एक साधी, सोपी गोष्ट विचारात घ्या.

'स्वाश्रय झिंदाबाद' या घोषणेवर चंद्रावरची वसाहत जिवंत राहील. 'स्वाश्रय झिंदाबाद' ही खरोखरच एक अभिनव घोषणा आहे. त्याचे असे आहे, मानवाला जगण्यासाठी प्राणवायू, अन्न आणि पाणी लागते. या गोष्टींचा उपयोग करून मानवाचे शरीर पाणी, उत्सर्जित पदार्थ आणि कर्बद्विप्राणील वायू बाहेर टाकते. मानवी शरीराने बाहेर टाकलेल्या या तीन गोष्टींचा वापर करून वनस्पतिसृष्टी वाढू शकते. वनस्पती वाढत असतानाच प्राणवायू बाहेर फेकला जातो. या वनस्पतीवर मानव जगत असतो. वनस्पती आणि मानव दोघे एकाच वेळी जगत असतात. 'जगा आणि जगूद्यात' हा त्यांच्या जीवनाचा एकमेव आधार बनतो.

आजचे विज्ञान, हे चक्र आणखी थोडे पुढे वाढवते. **मानव जे काही स्वतःच्या शरीराच्या बाहेर टाकतो त्याच्यावरच तो जगू शकतो...!** आपला ज्याच्यावर विश्वासही बसत नाही अशी ही गोष्ट आता शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध झालेली आहे. किंबहुना ही गोष्ट शक्य आहे म्हणूनच मानव नजीकच्या काळात मंगळावर उतरणार आहे. मंगळावर जाणाऱ्या यानाला अनेक महिने प्रवास करावा लागेल. इतक्या दिवसांसाठी पुरेल एवढे अन्न आणि पाणी काही अंतराळयानात नसेल. त्या वेळी अंतराळप्रवासी अनेक महिने वरील तत्त्वावर जगतील. स्वतःचे मूत्र रासायनिकरीत्या शुद्ध करून पिण्याचे पाणी म्हणून त्यांना वापरावे लागेल. स्वतःच्या उत्सर्जित पदार्थातील अन्नपदार्थ त्यांना वापरावे लागतील. शास्त्रीय भाषेत शास्त्रज्ञ हे असे मांडतात.

## एक अखंड चक्र

| शरीरात घेतलेले पदार्थ | किलो प्रतिदिन | शरीरातून बाहेर टाकलेले पदार्थ | किलो प्रतिदिन |
|---|---|---|---|
| प्राणवायु | ०·९० | कर्बद्विप्राणील वायु | १·०२ |
| अन्न (संपूर्ण कोरड्या स्वरूपात) | ०·६० | अन्नातील उत्सर्जीत पदार्थ | ०·०४ |
| अन्नातील कर्ब-ज्याचे कर्बद्वीप्राणील वायुत रूपांतर होते | ०·२८ | घामामधून गेलेले पाणी | १·०० |
| अन्नातील हैड्रोजन-ज्याचे पाण्यात रूपांतर होते | ०·२१ | उत्सर्जित पदार्थातील पाणी | ०·११ |
| अन्नातून मिळालेले पाणी | ०·४५ | मुत्र | १·३६ |
| एकूण पाणी | २·०३ | एकूण पाणी | २·४७ |
| एकूण बेरीज | ३·५३ | एकूण बेरीज | ३·५३ |

...एक गोष्ट खरी. या व अशाच उपायांवर चंद्रावरचे पहिले वहिले वसाहतवीर आपले दिवस काढतील. एक गोष्ट मात्र त्यांना मिळाली पाहिजे. हे चक्र चालू ठेवण्यासाठी विद्युत शक्ति हवी. पाण्यापासून प्राणवायु मिळवावयास विद्युतशक्ति हवी. कृत्रिमरित्या वनस्पती वाढवावयास प्रकाश म्हणजे पुन्हा विद्युत शक्तीच हवी. थोडक्यात, विद्युतशक्ति हा या वसाहतीच्या जीवनाचा आधार असेल. पृथ्वीवरून नेलेल्या छोटया अणुभट्या त्यांना पाहिजे तेवढी विद्युतशक्ति पुरवू शकतील. युरेनियमचा वा तत्सम किरणोत्सर्गी धातुचा साठा चंद्रावर असेलच. या वसाहती आता स्वावलंबी बनलेल्या असतील, स्वाश्रयी बनलेल्या असतील !

चंद्रावर वसाहत करणाऱ्या पहिल्या लोकांचे काम थोडे वेगळे असेल. चंद्रावर वातावरण नाही, ढग नाही, धुके नाही. त्यामुळे चंद्रावरून दुर्बिणीतून विश्वाचा अभ्यास अधिक चांगला करता येईल. दुरवरच्या सूर्यमालात संदेश पाठवण्यासाठी वा त्या सूर्यमालांतून आलेले संदेश स्वीकारण्यासाठी चंद्रावर खास प्रयोगशाळा असतील. पृथ्वीकडे पाठ करून उभ्या असलेल्या चंद्राच्या भागावर या प्रयोगशाळा असतील. पृथ्वीवरच्या गोंगाटापासून अलिप्त राहणारा हा भाग या प्रयोगांसाठी खूप उपयुक्त आहे.

काळाच्या अनिरुद्ध प्रवाहात अनेक वर्षे आता मागे पडतील. चंद्रावर आता नवे-नवे उद्योगधंदे निघालेत. एक समृद्ध संपन्न वसाहत आता तिथे आकार घेते आहे. चंद्रावर अनेक खनिजे विपूल स्वरूपात मिळताहेत. चंद्रावर प्राणवायु नाही त्यामुळे खाणीतून बाहेर काढलेले धातु फार थोडया श्रमात शुद्ध स्वरूपात मिळवता येताहेत. जे पदार्थ बनविण्यासाठी निर्वाताची जरुरी असते ते सारे पदार्थ बनविण्याची मक्तेदारी तर या वसाहतीकडेच आहे ! या वसाहतीत वाढलेल्या मुलांना, १५ दिवसाचा दिवस आणि १५ दिवसाची रात्र अंगवळणी पडलेली आहे. चंद्रावरचे गुरुत्वाकर्षण सोडून इतर कोणतेच गुरूत्वाकर्षण त्यांच्या प्रकृतीला झेपू शकत नाही ! एक वेगळी संस्कृति आता आकार घेत आहे. पृथ्वीवरच्याच काय पण मंगळ आणि बुध येथील वसाहतीपेक्षा 'चंद्र संस्कृती' श्रेष्ठ आहे असा या नव्या पिढीचा आग्रह आहे...

—साऱ्या घटना अशाच क्रमाने घडणार आहेत असे नव्हे. घटनांचा क्रम कदाचित वेगळा असेल. घटनाही यापेक्षा थोडया वेगळया असतील...पण अशाच स्वरूपाच्या घटना यापुढे अपरिहार्यपणे घडणार आहेत...चंद्र मंगळ बुध येथे नव्या समृद्ध मानवी संस्कृती आता उभ्या राहणार आहेत.

नीलचे पाय ज्या क्षणी चंद्रावर टेकले त्या क्षणी एक अद्‌भूत गोष्ट घडली... एक नवी मानवी संस्कृति निर्माण होण्याच्या एका अखंड प्रक्रियेची त्या क्षणी सुरुवात झाली !

□ □ □

चित्रपट


# बीच रेड

## नुसतं सुन्न बनून जावं

काही चित्रपट असे असतात की, ते नुसत्या मजेसाठी पाहावेत. खळखळून हसावे आणि चित्रपटासकट स्वत:लाही विसरून जावे. चित्रपटगृहातून बाहेर आले की, आपले मत म्हणजे कोरी पाटी ! निखळ मनोरंजनासाठी असे चित्रपट पाह्यचे आणि क्षणात विसरून जायचे; परंतु काही चित्रपट असे असतात की, ते आपल्याशी नाते जोडतात. आपल्या मनातले बोलतात. आपल्याला अंतर्मुख बनवतात, 'बीच रेड' हा असाच चित्रपट ! आपल्याला सुन्न बनवून टाकणारा, एकदम काळजातच रुतून राहणारा !

या चित्रपटात एका युद्धाचा सारीपाट मांडला आहे. जपान्यांच्या ताब्यात एक बेट आहे. बेटावर घनदाट, निबिड जंगल. जंगलात कोठेतरी एक छावणी आहे. गालाची हाडे वर आलेला, लांबोडचा चेहऱ्याचा जपानी सेनानी या छावणीत बसून आपली प्यादी हलवतोय. तिकडे सागरातून संकट येत आहे. तरण्याबांड अमेरिकन जवानांच्या तुकडचा बेटावर उतरत आहेत. मशिनगनमधून गोळचांचा पाऊस पडतो आहे. आमने-सामने विलक्षण जीवघेणी झटापट चालू आहे. सूं सूं करीत गोळचा येत आहेत आणि छातीच्या चिंधडचा उडवून देत आहेत. अमेरिकनांची फळी हळूहळू पुढे सरकते आहे. जंगलातून सावधपणे वाट काढते आहे. जपानी सैनिक मोक्याच्या जागा हेरून बसले आहेत. कोणी झाडाच्या शेंडचावर राय-फलींच्या सोबतीने दडून राहिले आहेत. शत्रू दिसला की गोळी सुटते आहे आणि झाडावर रक्ताचे शिपण होते आहे. बेट हे असं युद्धानं पार रक्ताळून गेलेय.

एवढचापुरताच जर हा चित्रपट असता तर तो एक सुरेख युद्धपट झाला असता. परंतु हा त्या अर्थाने नुसता युद्धपट राहत नाही; कारण युद्ध धुमसत असताना ते युद्ध खेळणाऱ्यांची मनेही कशी धुमसत असतात हे हा चित्रपट आलटून पालटून दाखवीत राहतो. चित्रपट मोठा झालाय तो याचमुळे. अमेरिकन तुकडीचा नेता आहे, कॅप्टन मॅकडोनाल्ड. समोर युद्धाचे पवित्रे घेत असताना त्याला आठवत राहते,



निर्माता । दिग्दर्शक । अभिनेता । कॉर्नेल वाईल्ड

आपल्या हसऱ्या चेहऱ्याची बायको. मधूनच डोळे मोठे करणारी, खळखळून मनसोक्त हसणारी, चिडवणारी आणि पती लढाईवर जाणार या विचाराने अत्यंत व्याकुळ होणारी त्याची पत्नी सारखी नजरेपुढे येत राहते; त्याच्या आठवणींचे हे स्थिर शॉट्स लोभसवाणे आहेत. 'लिपस्टिक लावताना आणि केस विंचरताना पाह्यचं नाही हं मला' असे लाडिकपणाने म्हणणारी, आपल्या छोकऱ्याशी स्वतः लहान मूल बनून वागणारी पत्नी मॅकडोनाल्डच्या मनात सारखी पिंगा घालीत राहते. बाहेर असते गोळ्यांचे थमान तर आत असतात अशा आर्त आठवणी !

अमेरिकन तुकडीत दोन कोवळे जवान आहेत. त्यांतला एक आहे तो मोठा भावनाविवश आहे. कोठेतरी त्याची प्रेयसी आहे आणि बंगल्याच्या आवारातील झुडुपात तिच्याशी घालविलेल्या क्षणांची त्याला याद येते आहे. दुसरा आहे तो मोठा बेरकी आणि मौजमजा करणारा. या लेकाच्याने अनेक पोरी खेळवल्या आहेत. त्याला आठवते ती आपण लढाईवर निघण्यापूर्वी उपभोगलेली एक पोरगी. कसली उंच होती ती. हा तिच्याशी पत्ते खेळला आणि मग तिच्याच देहात त्याने आपले शरीर बुडवून टाकले.

जपानी सेनानींचेही स्वतःचे छोटे भावविश्व आहे. त्याचा गोजिरवाणा संसार

आहे. प्रेमळ बायको आहे, मुले आहेत. त्यांची आठवण त्याला अस्वस्थ करते आहे. स्नानासाठी पाण्यात उतरलेली पत्नी त्याला दिसत आहे. पाण्यात काहीसे बुडालेले तिचे स्तन त्याला आठवत आहेत आणि त्याने रोमांचित होत असतानाच तो विषण्ण बनून जात आहे. त्याच्याच सैन्यात एक पूर्वीचा जपानी शेतकरी आहे. आपल्या कारभारणीची व शेतावर शिदोरी घेऊन येणाऱ्या आपल्या पोरांची याद त्याला हैराण करते आहे.

युद्धाचे रक्तरंगण चालू असताना प्रत्येकाच्या मनातील आठवणींची ही प्रतिबिंबे अत्यंत वेधकपणे व कलात्मकतेने टिपलेली आहेत. समोर एकमेकांचे जीव घेतले जात असताना प्रत्येकाचा जीव कशात तरी, कोठेतरी गुंतलेला आहे, हे हा चित्रपट अत्यंत प्रत्ययकारी रीतीने दाखवतो. त्यामुळे समोरील युद्धाला वेगळाच गूढ अर्थ येतो. जो तो कशासाठी तरी जगत असतो, कोणासाठी तरी जगत असतो. आणि हे जगणं शक्य व्हावं म्हणून काहीतरी करावं लागतं. लढाई त्यापैकीच एक. मग कोणाचा जीव घ्यायचा नसूनही यांत्रिकपणे रायफलीतील गोळी सुटत असते. कोणा-वर तरी प्रेम करतो आहोत ही भावना उराशी बाळगत असतानाच दुसऱ्या कोणाचा कचकन् जीव घेतला जात असतो. आपण समजतो तेथे युद्ध सुरू होत नसतं आणि




तुमच्या चेहेऱ्याची नि सौंदर्याची काळजी घ्या
विघळणारी मुरूमे नि पिंपल्स यांपासून हमखास संरक्षण मिळवा.
Nital
नितल
मुरूम पुटकुळ्यांवरील औषधि क्रीम
प्रतिबंधात्मक उपचार
मुरूमे, पुटकुळ्या विघळू नयेत किंवा बऱ्या झाल्यावर त्यांचा पुनः उपद्रव होऊ नये म्हणून, तुमच्या आवडीच्या तेल रहित फेस क्रीममध्ये थोडेसे 'नितल' मिसळून ते नेहमी वापरा.
सर्व प्रमुख केमिस्टांकडे मिळेल.
कोचीन पाम प्रा. लि.
कोचीन २.
वितरक : युनि-डिस्ट्रीब्यूटर्स प्रा. लि.
मुंबई २१,


बृहन्मुंबईकरिता वितरक :

मे. बी. जयंतीलाल अ‍ॅण्ड को., १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक :

**मे. वाय्. एस्. प्रभू अ‍ॅण्ड सन्स,** १२ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

आपण समजतो तेथे ते संपतही नसतं. युद्धामुळं जे मानसिक द्वंद्व सुरू होतं, जी चलबिचल होत असते ती संपणारी नसते, ती जाळत राहते.

या चित्रपटाचा नायक कोण ? साक्षात् मृत्यू ! सारे मृत्युच्याच दिशेने निघालेले. आता पोचायचं की नंतर, एवढाच प्रश्न. प्रत्येकाचं भावविश्व वेगळं. मरताना तेही संपायचं. आठवणीदेखील उरायच्या नाहीत. चित्रपटात फ्लॅशबॅक पद्धतीने ज्यांची भावविश्वे दाखविली आहेत त्यातील बहुतेक मरतात. त्या वेळी एका चित्रावर रक्त ओघळताना दाखविलेला शॉट खूप काही सांगून जातो.

हे सगळे जबरदस्त, विलक्षण घडत असताना काही विनोदी सिच्युएशन्सही मार्मिकपणे आलेल्या आहेत. दोघे अमेरिकन सैनिक झुडुपांच्या आडोशात लपून जपानी पलटण निरखीत असताना त्यातला एकजण सरळ त्या झुडुपाशी येतो तो लघुशंका करायला ! चित्रपटात एक छायाचित्रकार आहे. खरे म्हणजे तो प्रेक्षकांचा प्रतिनिधी समजायला हवा. कारण युद्धात काही घडो, त्याचं त्याला काही सोयर-सुतक नाही. फोटो घेत राहणं हेच त्याचे काम. एकदा त्याने ठेवलेले कॅमेऱ्याचं टोपण शत्रूच्या गोळीने उडून जाते. त्यावर हा ओरडतो, 'आर यू क्रेझी ?' हे छायाचित्रकाराचे पात्र, विनोदी प्रसंग चित्रपटाचा आशय आणखीच गडद, परिणाम-कारक करतात.

कॉर्नेल वाइल्ड हे या चित्रपटाचे 'सबकुछ' आहेत. दिग्दर्शक, निर्माते व अभिनेतेही तेच आहेत. त्यांच्या ठाशीव दिग्दर्शनामुळेच चित्रपट इतका यशस्वी झाला; किंबहुना कोणाच्याही भूमिकांपेक्षा पडद्याआडची ही भूमिकाच साऱ्या चित्र-पटावर आपले सावट ठेवून गेली आहे.

यातला एक सैनिक बोटीवर असलेला किडा आपल्या पायाने चिरडून टाकतो तेव्हा कोणीतरी असं कां केलंस ? असे विचारते. तेव्हा तो सैनिक म्हणतो, "मग काय त्या किडयाचं चुंबन घेऊ म्हणता ?" पुढे युद्धाला तोंड लागते तेव्हा त्या सैनिकाचा डावा हात तुटून पडतो. जिवाची विलक्षण घालमेल होते, वेदना अंगांगा-वर चढते तेव्हा त्या सैनिकाला दिसत राहते ती आपल्या बुटाची टाच आणि त्या-खाली चिरडला जाणारा किडा. मला वाटत चित्रपटाला जे काही सांगायचे ते सारं हे दृश्य सांगून टाकतं आणि आपण सुन्न बनून जातो.

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य
दि. २ ते ८ ऑगस्टचे भविष्य

**मेष :** नेहमीच ऑगस्ट महिना मेषराशी व्यक्तींना अनुकूल, प्रगतीचा, उत्साहाचा जाणवतो. याही वेळी आपणांस तसा प्रत्यय यावा.

नोकरीधंद्याचा प्रश्न मनाप्रमाणे सुटेल, औद्योगिक क्षेत्रात काही लोकांकडून विलक्षण कार्य करून दाखवण्याच्या इराद्याने पाऊले पुढे टाकली जातील. राहत्या जागेचा, नोकराचाकरांचा, वाहनांचा प्रश्न सोडविण्यात यशस्वी व्हाल.

आठवा मंगळ आणि साडेसाती यांमुळे सहजासहजी कोणतीही कामे होणार नाहीत. धावपळ, धडपडही करावी लागेलच. असे असले तरी अपयशाची मुळीच भीती नको. दि. ४ च्या गुरु-हर्शल समक्रांतीपासून आपल्या योजना आकार घेऊ लागतील. दि. ५ ते ७ या काळी बरीच कामे यशस्वी ठरावीत.

**वृषभ :** गेल्या आठवडयात सूर्य-मंगळांचा त्रिकोण झाला आणि तेव्हापासूनच आपला सारा अनिष्ट काळ ओसरल्याचा प्रत्यय येऊ लागलेला असेल. या आठवडयातही आपला उत्साह वाढणाऱ्या अनेक गोष्टी घडू लागतील.

वादविवाद, संघर्ष मिटेल. भागीदारीच्या पेचप्रसंगावर प्रभावी तोडगा सापडेल नवा व्यवसाय-धंदा करण्याचे आपले अपुरे स्वप्न या कालापासूनच आकाराला यायला लागेल. गुरु-शुक्र तुम्हांला सांपत्तिकदृष्टया थोडेफार अनुकूल ठरतील. सहकाऱ्यांचे हार्दिक सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल. दि. २ ते ५ आपल्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल व्हाव्यात.

**मिथुन :** ह्या आठवडा अपेक्षेप्रमाणे यश, स्वास्थ्य देणारा नसला तरी अपेक्षाभंगाचे दुःख निर्माण करणारा नाही हे काय कमी आहे ?

प्रयत्नांची शिकस्त केलीत तर या आठवडयापासून आपली पावले मंदगतीने पुढे पडू लागतील.

नवा शिक्षणक्रम सुरू होईल, परप्रांती जाण्याचे निश्चित ठरेल. उद्योगधंद्याचे स्वरूप काहीसे आकर्षक दिसू लागेल. आपल्या राहत्या जागेचा प्रश्न मात्र या वेळचा चौथा गुरू निश्चितपणे सोडवू शकेल. उद्योगधंद्याचे तंत्र बदलणे परिणामी हिताचे ठरेल, अशी खात्री वाटू लागेल. सांपत्तिक बाबतीत आता पूर्वीइतका ताण

बसणार नाही. दि. ४ ते ७ या कालावर लक्ष केंद्रित करा.

कर्क : तुमच्या राशीतून सूर्याचे संचलन सुरू आहे, तो स्वास्थ्य देऊ शकत नसला तरी अपेक्षेबाहेर यश देऊन जाईल. तुमच्या बाजूला पडलेल्या साऱ्या योजना प्रकाशात आणील. वैद्यकीय, रासायनिक, यांत्रिक व्यवहाराशी संबंध असलेल्यांना हा कर्केचा सूर्य बरेचसे काही देऊन जाईल. आरोग्य काहीसे नरमगरम राहीलही, पण त्यामुळे तुम्ही हाती घेतलेले कार्यक्रम बिघडू शकणार नाहीत.

नवे स्नेहसंबंध निर्माण होतील, मंगलकार्याचा प्रश्न सुटण्याची लक्षणे दिसायला लागतील. आवश्यक इतका पैसाही हाती येईल.

दि. ६ ते ९ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

सिंह : सूर्य व्ययात आणि मंगळ चतुर्थात ही ग्रहस्थिती फारशी वाईट नसली तरी ती अनुकूल आहे असे म्हणता येणार नाही. हाती घेतलेली कामे मंदावतील, भरमसाट खर्च करूनही अपेक्षेप्रमाणे घडेल असे दिसत नाही.

असे आहे म्हणून तुम्हांला माघार घेण्याचा प्रसंग चुकूनही येणार नाही. अनेकांचे साहाय्य मिळून पुढे जावे लागेल. नोकरीमध्ये स्थानांतर, बदल घडून येण्याची लक्षणे दिसू लागतील, राजकीय जबाबदाऱ्या वाढू लागतील, सामाजिक कार्यक्रमात आपल्याच खिशाला चाट बसेल. एकंदर काही काळ जपून वागणे आवश्यक आहे.

दि. ४ ते ६ या काली अनेक कामे गती घेऊ लागतील.

कन्या : या वेळी अंतरिक्षीय ग्रहस्थिती आपणांस अधिकाधिक अनुकूल आहे आणि म्हणूनच गेल्या कित्येक महिन्यांत शिकस्तीचा प्रयत्न करूनही जे घडू शकले नाही ते या वेळी सहजासहजी घडून येईल.

नोकरीधंद्यात अनेक चांगल्या संधी समोर उभ्या राहतील. अनपेक्षितपणे बदली-बढतीचे योग येतील, अत्यंत अवघड कामेही थोरांच्या मदतीने यशस्वी ठरतील.

आपल्या जीवनात अनेक यशस्वी व आनंददायक गोष्टी घडवून आणणारा हा काल आहे. सहज काही करावे आणि ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठावे असा प्रत्यय पदोपदी यायला लागेल. अनपेक्षित स्वरूपाचे लाभ होणेही अशक्य नाही.

दि. ६ ते ८ या कालांचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

तूळ : तुम्हा साऱ्या तूळराशी व्यक्तींचे आराध्य दैवत शुक्र. ते तुमच्या भाग्यस्थानी प्रकटेल. अशी वेळ वर्षातून एकदाच येत असते. त्या संधीचा फायदा करून घेतलात तर तुम्हांला कोणत्याही गोष्टींची उणीव सहसा भासू शकणार नाही. साहित्यिकांना, कलावंतांना तर इतका चांगला काल याच वेळी लाभत आहे.

दीर्घ मुदतीचे आकर्षक करारमदार होतील, दूरच्या प्रवासामुळे सांपत्तिक लाभ तर होतीलच, शिवाय तुमची लोकप्रियताही वाढीस लागेल, प्रियजनांच्या भेटीगाठी होतील, अपेक्षित कार्यांना चालना मिळेल. मंगलकार्याचे जवळ जवळ निश्चित ठरेल.

दि. ३ ते ५ विशेष काल अनुकूल काल.

वृश्चिक : आपणांस सध्याइतकी सर्वांगाने अनुकूल ग्रहस्थिती यापूर्वी क्वचितच लाभली असेल. सूर्य भाग्यात, गुरू एकादशात या अधिकाधिक अनुकूल ग्रहस्थितीमुळे आपण काहीही करायचे ठरविलेत तरी ते यशस्वी ठरू शकेल.

अधिकाऱ्यांची कृपा, धनिकांचे साहाय्य, इष्टमित्रांची अनुकूलता मिळाल्यावर आपल्या साऱ्या योजना यशस्वी व्हायला मुळीच वेळ लागणार नाही. आपल्या कामांना गती मिळेल, धान्योत्पादनाचे निरनिराळे मार्ग दृष्टिक्षेपात येतील, नैतिक सामर्थ्य वाढीस लागेल. शेती, रासायनिक खते, धान्योत्पादन इ. व्यवहारांत आजवर कधी झाला नसेल एवढा लाभ होईल. दि. ५–६–८ सर्व दृष्टींनी अनुकूल काल.

धनू : मंगळ मार्गी झालेला असला तरी तो बारावा आहे. आणि अशा वेळी सूर्यही अष्टमस्थानातून जात आहे या चमत्कारिक ग्रहस्थितीमुळे प्रकृती, पैसा आणि स्वास्थ्य या बाबतीत फारशी चांगली स्थिती जाणवणार नाही. म्हणून प्रत्येक गोष्टीत जपून, विचाराने पावले टाकायला हवीत. अर्थात् ही अनिष्टता दीर्घकाल अनुभवावी लागणार नाही. पंधरा–वीस दिवसांतच प्रसन्न व अनुकूल वातावरण सर्वत्र दिसायला लागेल. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका. दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा आणि प्रत्येक कार्यात थोरांचे सहकार्य घ्या. दि. ५–६–८ या काळात काही गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडाव्यात.

मकर : पूर्वीप्रमाणे आपल्या प्रगतीची घोडदौड याही आठवड्यात सुरू राहील. नोकरीधंद्यातील साऱ्या योजना कार्यान्वित होतील, प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात येतील, थोरांच्या साहाय्याने आजवर घडून न आलेल्या बऱ्याचशा गोष्टी यशस्वी करून दाखवाल.

सध्याचा सूर्य–मंगळ त्रिकोण तुमच्या कर्तृत्वाला उधाण आणील, यांत्रिक–वैज्ञानिक क्षेत्रात तर तुम्हांला कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही.




तात्पर्य, हा कालच असा आहे की, आपण ज जे कराल ते ते घवघवीत यश घेऊन उठेल. दि. ३—५—६ अपेक्षेबाहेर यश देऊन जाईल.


**कुंभ :** शुक्र पंचमात असेपर्यंत तरी, तुम्हांला व्यावसायिक बाबतीत कसलीच चिंता करायचे कारण नाही; आणि नजीकच्या भविष्यकालात गुरू तुम्हांला अधिकाधिक अनुकूल येणार असल्यामुळे, त्याची प्रसादचिन्हे आतापासूनच दिसायला लागतील.

लवकरच तुमच्या जीवनात एक नवे पर्व सुरू होत आहे. उद्योग-धंद्यात क्रांती घडवून आणली जाईल, नवे प्रतिष्ठेचे स्थान लवकरच लाभण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील. राजकीय—सामाजिक क्षेत्रांतही तुमचे स्थान उंचावू लागेल.

दि. ३—५—७ या काळी अनेक योजना आकाराला येतील.

**मीन :** गेल्या काही दिवसांपासून तुमचे व्यावसायिक क्षेत्र अधिकाधिक गतिमान होत आहे. हा आठवडा त्यात आणखीन थोडी भरच घालील. सध्याची तुमची साडेसाती नावापुरतीच. कोणताही ग्रह सहसा तुमच्या प्रगतीच्या आड येऊ शकणार नाही. व्यावसायिक क्षेत्र विस्तारेल, नव्या योजना यशस्वी ठरतील, सांपत्तिक स्थिती चांगलीच सुधारेल, नवी जागा लाभदायक ठरेल, प्रयत्न केलात तर नवे वाहन लाभणेही अशक्य नाही. आपल्या कौटुंबिक समस्याही उत्तम सुटाव्यात. दि. ४—६—८ या काळी अनपेक्षितपणे थोरांचे साहाय्य लाभेल.

□ □



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

'माणूस' १५ ऑगस्ट विशेषांक....

## १. विद्यार्थी असे का वागले ? वागतात ?

११ जुलैच्या पुण्यातील फीवाढ विरोधी चळवळीचा विद्यार्थी, पालक व शिक्षणसंस्थांचे चालक यांच्या दृष्टिकोनातून केलेला साधकबाधक विचार

... वि. शं. पारगावकर

## २. दिल्ली दरबारचे नवे अंतरंग

'कलकत्ता दिनांक' आटोपून 'चंद्रशेखर' दिल्लीस दाखल झालेले आहेत. राष्ट्रपती निवडणूक, बँक राष्ट्रीयकरण विधेयक यामुळे दिल्लीची हवा सध्या तंग आहे.

या तंग हवामानाचे भन्नाट चित्रण

## ३. तेलंगण .... लेखक ?

'दादुमिया' ही आघाडी समर्थपणे सांभाळीत आहेत.


**कथा-साहित्य-विभाग**

**ब. मो. पुरंदरे, द. मा. मिरासदार, वसंत पोतदार. ..**

## शिवाय....

# ....शिवाय

श्रमपरिहारास्तव चित्रकार वसंत सरवटे यांची ' फक्त होतकरू लोकांसाठीच ' असलेली एक अभिनव स्पर्धा...



## कसे कुठे जाणार?

भरगच्च, विचारप्रवर्तक साहित्य व स्पर्धेचे आकर्षण यांमुळे अंक अपुरा पडण्याची शक्यता आहे. संबधितांनी कृपया नोंद घ्यावी.

**या अंकाची प्रसिद्धी : १५ ऑगस्ट**
**या अंकाची किंमत : दोन रुपये**
**या अंकाचा आकार : नेहमीच्या दुप्पट**
**या अंकाची पृष्ठसंख्या : अंदाजे ऐंशी ते नव्वद**

**या अंकामुळे ' माणूस 'चा दिनांक २३ ऑगस्टचा अंक बंद राहील.**

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649




"हे केवळ आज चंद्रावर मानवानं पाऊल ठेवलं त्याला अभिवादन म्हणून बरं का! खरोखरच ऐतिहासिक महत्त्वाचा दिसतो आजचा दिवस!"

९ ऑगस्ट ६९

# माणूस

चाळीस पैसे

## जब तक बहे जमनाका पानी। तब तक रहे इंदिरा रानी....

तरुण तुर्कांच्या वर्तुळात 'चंद्रशेखर' यांना ऐकू आलेली नवी घोषणा...

'The last word has not been said'

मोरारजी देसाई यांनी मुलाखतीच्या अखेरीस व्यक्त केलेला हा आशावाद... दिल्लीच्या राजकीय शेअरबाजारात आज किती चढउतार सुरू आहेत याची यावरून काहीशी कल्पना यावी.

यापुढील १५ ऑगस्ट विशेषांकात हा चढउतार टिपण्याचा 'चंद्रशेखर' यांनी प्रयत्न केलेला आहे.

## हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीचे कमांडर-इन-चीफ

—अल्फ्रेड पार्कमध्ये हजारो ब्रिटिश सोजिरांच्या गोळीबाराला सामना देत देत मृत्युमुखी पडलेल्या ऐन पंचविशीतील क्रांतिकारकाची वसंत पोतदार लिखित वीरगाथा.

प्रा. पंढरीनाथ रानडे अनुवादित

## इवान मिनाएव यांची ऐतिहासिक दैनंदिनी....

दादुमिया, द. मा. मिरासदार, ब. मो. पुरंदरे

— १५ ऑगस्ट अंकाची हीही आणखी काही आकर्षणे...

# कोयना

या पंधरवड्यात भरपूर पाऊस झाला व शिवाजीसागर तलावातील पाण्याची पातळी रोज वाढत आहे. धरण पाण्याने पूर्ण भरू द्यावे किंवा सतत पाणी सोडलेले ठेवून ते एका विशिष्ट पातळीवर भरू देऊ नये, याचा ठाम निर्णय झाला नव्हता. पावसाळ्यानंतरच्या महिन्यांत खाली सांगली-मिरजेकडून जेव्हा पाण्यासाठी हाकाटी सुरू होते, तेव्हा जरूर तर पाणी सोडता यावे या उद्देशाने धरण भरले तर बरे, असा विचार असावा. मागल्या वर्षी धरण भरले नाही व खाली पाणी सोडावे लागले. अप्रत्यक्ष परिणाम म्हणून वीज वापरावर १६ टक्के कपात जाहीर करावी लागली. तशी वेळ यंदा येऊ नये, असा विचार असला तरी ओसंडून वाहणारे धरण बिकट प्रसंग आला तर महापुराची आपत्ती सतत टांगती ठेवते यात संशय नाही. सारे काही आलबेल आहे असे फतवे वरच्या वर काढले जात असले, तरी लहान-मोठ्या (जाणवणाऱ्या व न जाणवणाऱ्या) धक्क्यांची संख्या वाढत आहे. दि. २३ जुलै ते २४ जुलैपर्यंतच्या फक्त चोवीस तासांत अशा १७ धक्क्यांची नोंद झाली व पहाटे ३ वाजून १९ मिनिटांनी बसलेला धक्का सुमारे ४॥ इतक्या परिमाणाचा होता. त्यामुळेच सतत वाढणारी पातळी हा एक अधिकाऱ्यांपुढे चिंतेचा विषय आहे. यापुढे पाणी सोडावे असे ठरविले तरी त्याचा जवळ जवळ काही उपयोग नाही. कारण पाणी सोडल्यामुळे रोज फक्त अर्धा फूट पातळी उतरू शकते तर सध्या ती रोज ३ ते ४ फुटांनी वाढत आहे. आज (दि. २९–७–६९ रोजी) पातळी २११० फूट आहे. ओसंडून वाहण्यासाठी आवश्यक पातळी २१३३॥ आहे. म्हणजे आता फक्त २३॥ फूट उंची भरणे बाकी आहे.

धरण आता ओसंडून वाहणार यांत शंका नाही. तेव्हा हा मानसिक ताण कमी करण्यासाठी एक मजेदार शर्यत येथे लागली आहे. धरण कोणत्या दिवशी (व शक्यतर वेळेला) आपल्या 'षड जिव्हांनी ओसंडून चुळा टाकू लागेल,' ते एक रुपया प्रवेश-फीसह सांगावयाचे. ज्याचा अंदाज अचूक ठरेल त्याला जमलेला सगळा गल्ला मिळेल. नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या निकालाने हतबल झालेल्यांत या नव्या शर्यतीने थोडा उत्साह आला आहे. त्यांतले काही अतिउत्साही तर याचीसुद्धा विविध उत्तरे देऊन 'सिंडिकेट' करण्याच्या विचारांत आहेत.

[कव्हर ३ वर]